रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८८ | अंक ४ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १० जून २०२४

किंमत ४ ₹

## किशोर जैन यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**नागोठणे :** विधानपरिषदेच्य कोकण पदवीधर मतदार संघासाठी नागोठण्याचे सुपुत्र, शिवसेना(उबाठा) जिल्हा सहसंपर्क प्रमुख व नागोठण्यातील नावाजलेल्या भारतीय एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष किशोर जैन यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. कोकण भवन येथे रायगडसह संपूर्ण कोकणातून केवळ एका मेसेजवर मोठ्या संख्येने आलेल्या पान २ वर

## मान्सून रायगडात दाखल

**अलिबाग :** नैऋत्य मान्सून रायगड जिल्ह्यात ७ जूनलाच दाखल झाला. शनिवारी रात्री जिल्ह्यात पावसाने सुरुवात केली.यामुळे  रविवारी दिवसभर रायगड जिल्ह्यातील वातावरण आबादानी झाले होते. सायंकाळी आकाशात पावसाचे ढग दाटून आले. यामुळे सुर्यास्त होताना पावसाने मुसळधार सुरुवात केली. झालेल्या पावसाने नागरिकांची तारांबळ उडाली होती. ठिकठिकाणी पाण्याचे लोट वाहू लागले होते. तर काही ठिकाणी पावसाचे पाणी साचून तळे निर्माण झाले होते. पाऊस सुरु झाल्याने विजेचा लपंडावदेखील सुरु झाला होता.

### वे|ध|क

## कोकण पदवीधरसाठी उमेदवारांची 'भाऊगर्दी'

**रायगड :** कोकण पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांची भाऊगर्दी वाढली आहे. विशेष म्हणजे लोकसभा निवडणूक एकदिलाने लढलेल्या महायुती आणि महाविकास आघाडीची पदवीधर निवडणुकीत फाटाफूट झाली आहे. प्रत्येक पक्ष व गटाने स्वतंत्र उमेदवार निवडणूक रिंगणात उतरवले आहे. सर्वात आधी दावा ठोकणाऱ्या मनसेने आयत्यावेळी माघार घेतली असली, तरी भाजप, शिवसेना ठाकरे गट, पान २ वर

## पांडियन यांचा राजकीय संन्यास

**भुवनेश्वर:** ओडिशाचे माजी मुख्यमंत्री, बीजेडी प्रमुख नवीन पटनायक यांचे निकटवर्तीय बीजेडी नेते व्हीके पांडियन यांनी सक्रिय राजकारणातून संन्यास घेतल्याची घोषणा केली आहे. त्यांनी रविवारी एक व्हिडिओ जारी करून याची घोषणा केली.व्हिडिओमध्ये ते म्हणाले, मी सक्रिय राजकारणापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रवासात माझ्यामुळे कोणाचे मन दुखावले असेल तर मला माफ करा. माझ्याविरोधातील प्रचारामुळे बीजेडीचा पराभव झाला तर मला माफ करा. ओडिशामध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने पान २ वर

# 3.0 मध्ये कुरबुरी

- 'राष्ट्रवादी'ने राज्यमंत्रीपद नाकारले
- विस्तारीत मंत्री मंडळात कॅबिनेट मंत्री देण्याची मागणी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

भारतीय जनता पार्टीच्यावतीने अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला राज्यमंत्री स्वतंत्र प्रभाराची ऑफर देण्यात आली होती. परंतु एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्रीपद पाहिजे असल्याने अजित पवार गटाने राज्यमंत्रीपद नाकारल्याचे बोलले जाते.

मोदी सरकार ३.० सुरु होण्याआधीच घटक पक्षात कुरबुरी सुरु झाल्या आहेत. पवार गटाला मनाप्रमाणे मंत्री मंडळात स्थान न मिळाल्याने त्यांच्यामध्ये नाराजी आहे, हे काही लपलेले नाही. येत्या कालावधीत होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या विस्तारात कॅबिनेट मंत्रीपदच दिले जावे, अशी मागणी अजित पवार गटाने केली आहे. त्यासाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

खासदार प्रफुल्ल पटेल यांनी रविवारी पार पडलेल्या मोदींसह अन्य खासदारांच्या शपथ विधीकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. अजित पवार गटाकडून प्रफुल्ल पटेल यांचे नाव निश्चित करण्यात आले होते. परंतु, कॅबिनेट मंत्री राहिलेल्या व्यक्तीला पान २ वर

**अजित पवार गटाचे एकमेव सुनील तटकरे हे खासदार म्हणून निवडून गेले आहेत, तर प्रफुल्ल पटेल हे राज्यसभेवर खासदार आहेत. या आधी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये पटेल यांनी केंद्रीय मंत्री पदाचा कारभार केलेला आहे. त्यामुळे त्यांना कॅबिनेटपदी वर्णी लागणे क्रमप्राप्त आहे, तर सुनील तटकरे यांनी शिवसेनेचे (ठाकरे गट) अनंत गीते यांचा तब्बल ८२ हजार मताधिक्याने पराभव करुन खासदार म्हणून निवडून आले आहेत. त्यामुळे अजित पवार गटाने पटेल आणि तटकरे यांची मंत्रीमंडळात वर्णी लागावी यासाठी एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्रीपद मागितल्याचे सूत्रांनी सांगितले. मात्र भाजपाच्या मोदी-शाहा यांनी त्यांना एकच राज्यमंत्री देऊ करत ठेंगा दाखवल्याचीही चर्चा राजकीय वर्तुळात आहे.**



# नरेंद्र मोदींनी घेतली पंतप्रधानपदाची शपथ

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

नरेंद्र मोदी यांनी रविवारी सायंकाळी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात होणाऱ्या एनडीए सरकारच्या शपथविधी सोहळ्यासाठी देश विदेशातील सेलिब्रिटींची उपस्थिती पाहायला मिळाली.



विशेष म्हणजे, यावेळी नरेंद्र मोदींसोबतच अन्य खासदारांनी कॅबिनेट आणि राज्यमंत्रीपदाची शपथ घेतली. या सोहळ्यासाठी भारताच्या शेजारील देशांचे प्रमुख उपस्थिती होते.या सोहळ्यासाठी मालदीवचे अध्यक्ष मोहम्मद मुइज्जू, श्रीलंकेचे अध्यक्ष रानिल विक्रम सिंघे, सेशेल्सचे उप राष्ट्रपती अहमद अफिफ, मॉरिशसचे पंतप्रधान प्रविंद कुमार जुगनाथ, बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना, नेपाळचे पंतप्रधान पुष्प कमल दहल 'प्रचंड' आणि भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे उपस्थित होते. यावेळी रजनिकांत, मुकेश अंबानी, गौतम अदानी, अक्षय कुमार यांचाही उपस्थितांमध्ये समावेश होता.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील नवीन टीममध्ये ३० कॅबिनेट मंत्री, ५ स्वतंत्र प्रभार असलेले राज्यमंत्री आणि ३६ राज्यमंत्र्यांचा समावेश आहे. मंत्रिमंडळात २७ ओबीसी, १० एससी, ५ एसटी, ५ अल्पसंख्याक मंत्री असतील.

## धनदांडग्यांसाठी ५ कोटींची संरक्षक भिंत

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

### अमिर ठाकूर यांचा आरोप



शासन संरक्षक भिंतींची कामे ही दरडी कोसळण्याच्या ओढवणाऱ्या नैसर्गिक आपत्तींपासून नागरिकांचे संरक्षण व्हावे यासाठी करीत असते. परंतु मुरूड तालुक्यातील भोईघर येथे संरक्षक भिंतींचे सुमारे ५ कोटींचे काम केवळ धनदांडग्यांच्या मालमत्तांच्या रक्षणासाठी मंजूर करण्यात आले असून ते कामही निकृष्ट दर्जाचे आहे.

त्यामध्ये कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप शिवसेना (उबाठा) जिल्हा युवासेना प्रमुख अमिर उर्फ पिंट्या ठाकूर यांनी केला आहे. त्यांनी या बाबतची लेखी तक्रार सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे ईमेलव्दारे केली आहे.

दरडींमुळे वाहतूक विस्कळीत होणाऱ्या ठिकाणांमध्ये प्रामुख्याने आंबेनळी घाट आणि कशेडी घाट, कार्ले खिंड, ताम्हाणी घाट, अंडा पॉईंट , सुकेळी खिंड आणि भिसे खिंड आणि भोईघरचा यात समावेश नाही. भोईघर येथील पान २ वर

## माथेरानमध्ये पर्यावरणपूरक रिक्षा दाखल

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या थंड हवेच्या आणि पर्यावरण दृष्ट्या संवेदन असलेल्या शहरात पर्यावरणपूरक ई-रिक्षा चालविल्या जात आहेत. माथेरानमधील हातरिक्षा चालक यांच्यासाठी पर्यावरणपूरक ई-रिक्षा चालविण्यात याव्यात अशी मागणी सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली आहे. त्यानुसार श्रमिकांच्या हाती या पर्यावरण पूरक ई-रिक्षा यांचे स्टिअरिंग दिले जाणार असून उद्या

### श्रमिकांच्या हाती ई-रिक्षा



सोमवारी हा सोहळा माथेरानमध्ये आयोजित करण्यात आला आहे. शहरात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने पान २ वर

### ४० हातरिक्षा चालकांकडे परवाने

**माथेरानमध्ये ५ डिसेंबर २०२२ मध्ये ई-रिक्षा सुरू झाल्यावर बहुसंख्य हातरिक्षा चालक यांनी रिक्षा चालविण्याचे परवाने घेण्यासाठी प्रशिक्षण घेतले आहेत त्यांना मिळणार आहेत. आजच्या घडीला माथेरान मधील ४० हातरिक्षा चालक यांच्याकडे परवाने आहेत. तर ई-रिक्षा चालविण्यासाठी आवश्यक असलेले बॅच ३६ हातरिक्षा** पान २ वर



## चौकशीचा ससेमिरा लागण्याच्या भीतीने
# मत्स्यव्यवसाय विभागाचे धाबे दणाणले?

**। उरण । वार्ताहर ।**

**मासेमारी करताना नियमांचे खुलेआमपणे उल्लंघन केले जात आहे. याबाबत अनेकवेळा लेखी तक्रारी करूनही मत्स्य विभागाचे अधिकारी कारवाई करण्याऐवजी संबंधितांना पाठीशी घालत आहेत. तरी या सर्व प्रकरणांची तसेच पर्ससीन मासेमारी करणाऱ्यांचा तपास करुन चौकशी करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश फिशरमॅन काँग्रेसचे मुख्य सम न्वयक मिल्टन सौदिया यांनी केली आहे. यामुळे मत्स्य विभाग अधिकारी वर्गाचे धाबे दणाणल्याचे बोलले जाते.**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील पर्ससीन मासेमारी आणि या मासेमारीचा पारंपरिक मच्छिमारांच्या उपजीविकेवर तथा सागरी पर्यावरण आणि मत्स्यस्थितीवर होणारा विपरित परिणाम याचा अभ्यास करण्यासाठी डॉ. व्ही. एस. सोमवंशी यांची अभ्यास समिती नेमली होती. शासनाने १० ऑगस्ट २०२२ च्या आदेशान्वये पर्ससीन मासेमारीवर नियंत्रण आणले. मत्स्यव्यवसाय विभागाकडून या आदेशाचे पालन सर्वत्र होत नसल्याचे दिसून येत आहे.

सन २००९ ते २०१२ या कालावधीत राष्ट्रीय सहकार विकास निगम अंतर्गत अर्थसहाय्य घेऊन बांधण्यात आलेल्या नौकांना पर्ससीन मासेमारीचे परवाने देण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय सहकार विकास निगम अंतर्गत फक्त ट्रॉलर्सनाच अर्थसहाय्य देण्यात आलेले असताना त्यांना पर्ससीन मासेमारीचे परवाने देण्यात आले. यावरून त्या त्या वेळचे अधिकारी आणि पर्ससीन मच्छिमार यांच्यात मोठी आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा आमचा दाट संशय आहे, असे निवदेनात नमुद केले आहे.

तसेच ५ फेब्रुवारी २०१६ रोजी काही अटी-शर्ती ठेवून पर्ससीन मच्छिमारांना राज्याच्या सागरी जलधी क्षेत्राबाहेर म्हणजे १२ सागरी मैलांच्या पलीकडील क्षेत्रात मासेमारी करण्यास परवानगी दिली होती. त्यानुसार मूळ मच्छिमार समाजातील मच्छिमारांनी विविध वित्तीय संस्था, बँका, सावकार, बर्फविक्रेते, पाणीविक्रेते असे विविध व्यावसायिक यांच्याकडून उसनवारी करून या व्यवसायात गुंतवणूक केली आणि पर्ससीन मासेमारीचा व्यवसाय सुरू केला. त्यानंतर २०१८ मध्ये पर्ससीनचे परवाने रद्द करण्यात आले. त्याचा परिणाम असा झाला की, कंटाललेले मूळ मच्छिमार पर्ससीनच्या व्यवसायातून बाहेर फेकले गेले आणि बिगर मच्छिमार समाजातील धनिक भांडवलदारांनी या व्यवसायाचा ताबा घेतला. या बेकायदा पर्ससीन मासेमारीस मंजूर होणारा अनुदानित डिझेल कोटा तथा त्यावरील प्रतिपूर्ती रकमेच्या माध्यमातून शासनाच्या तिजोरीवरही नाहक भार पडत आहे. वर्षानुवर्षे शासकीय निधीची बेमालुमपणे उधळपट्टी होत आहे, असे सौदीया यांनी सांगितले.

ससून डॉक, भाऊचा धक्का, करंजा, रेवस आदी बंदरात शेकडोंनी पर्ससीन नौका समुद्रातून आणलेली मासळी उतरवताना दिसतात. तसेच बिगर मच्छिम ार समाजातील धनिक भांडवलदारांनी मूळ मच्छिमारांच्या बोटींवर काम करणाऱ्या खलाशांना विविध आमिषे दाखवून त्यांना आपल्याकडे खेचून घेतल्यानंतर मूळ मच्छिमारांना मासेमारी व्यवसायाकरिता खलाशी मिळणार नाहीत, अशी स्थिती या धनिक भांडवलदारांनी करून ठेवली आहे. आज या धनिक भांडवलदारांच्या पर्ससीन बोटी खुलेआम बेकायदा पर्ससीन मासेमारी करत आहेत.

या सर्व मागण्यांची सखोल चौकशी करून अहवाल तथा केलेल्या कारवाईची माहिती देण्याचे निर्देश आपण संबंधित अधिकाऱ्यांना निर्गमित करावेत, अशी मागणी सौदिया यांनी दिलेल्या निवेदनात केली आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मत्स्यव्यवसाय मंत्री, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अध्यक्ष नानाभाऊ पटोले, कृषी व पदुम विभाग, पदुम सचिव, मत्स्य व्यवसाय विभाग आयुक्त, मत्स्य व्यवसाय प्रादेशिक उपायुक्त आदींना दिल्या आहेत.

# एसटी स्थानकात वृध्द महिलेच्या पर्सची चोरी

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**

येथील राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानक आवारात एका वयोवृध्द प्रवासी महिला गावी जाण्यासाठी बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरटयाने महिलेची पर्स लंपास केली. यानंतर चोरटयाने पलायन केले असून या घटनेनंतर पोलादपूर पोलीसांनी एस.टी.स्थानकामध्ये महिला व पुरूष पोलीस कॉन्टेबल्स तैनात करून बंदोबस्त वाढविला आहे.

सदरची घटना शुक्रवारी ७ जून रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घडली. चोरांकडून महिला प्रवाशांना लक्ष्य करण्यासाठी

एसटी बसस्थानकामध्ये चोऱ्या केल्या जात असून पोलादपूर स्थानकातील गेल्या महिनाभरातील ही दुसरी चोरीची घटना असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. पोलादपूर पोलीस ठाणे हद्दीत ७ जून २०२४ रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास पोलादपूर एस.टी. बस स्टँड परिसरात महिला फिर्यादी पोलादपूर ते साखर खडकवाडी असा प्रवास करण्यासाठी एस.टी बसमध्ये चढत असताना गर्दीतून त्यांच्या पर्समधून दोन पॉकेटमध्ये असलेले २६ हजार रूपये व इतर कागदपत्र व आधारकार्ड कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे वृध्दापकाळाचा फायदा घेवून चोरली. यानंतर चोराने पोबारा केला. एसटी बस स्थानकात सीसीटीव्ही बसविण्याची मागणी प्रवासी वर्गाकडून करण्यात येत आहे. पोलादपूर शहरातील खासगी बस थांबण्याच्या ठिकाणी महिला प्रवाशांची संख्या कमी असल्याने त्याठिकाणी चोरीचे प्रकार घडताना दिसत नाहीत.

# पावसाआधीच शेवळाची भाजी बाजारात

**। उरण । वार्ताहर ।**

जून महिना उजाडून पावसाला सुरुवात होण्याआधीच रानभाजी ओळखली जाणारी शेवळाची भाजी उरणच्या बाजारात विक्रीसाठी आली आहे. शेवळाची जुडी ही ५० रुपयाला विकली जात आहे. काही दिवसात भाजी विक्रीसाठी बाजारात जास्त आल्यानंतर जुडीचा दर कमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शेवळाची भाजी पोटाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. ड जीवनसत्त्व असलेल्या भाज्या खूप कमी आहेत. त्यातली एक शेवळाची भाजी समजली जाते. स्त्रियांच्या आरोग्यासाठी ही भाजी महत्त्वाची मानली जाते. पावसाळा सुरु झाला की रानभाज्यांचे वेध लागतात. दाट जंगलात आपोआप उगवणाऱ्या, सर्वत्र उपलब्ध न होणाऱ्या या भाज्या म्हणजे चवीची मेजवानी असतात. एका मर्यादीत कालवधीत उपलब्ध होणाऱ्या या रानभाज्या म्हणजे पोषक गुणांची खाण असतात. शेवळाच्या भाजीला जंगली सुरण असेही म्हणतात.



खास मराठी लोकांच्या आहारात पावसाळ्यातल्या या शेवळाच्या भाजीला मोठे महत्त्व आहे. शेवळाच्या भाजीला इंग्रजीमधे ड्रॅगन स्टॉक याम असे म्हणतात. महाराष्ट्रीयन संस्कृतीच्या वैशिष्ट्यांपैकी एक असलेली ही शेवळाची भाजी. ही भाजी डोंगराळ भागात दाट जंगलात येते. त्याची शेती करता येत नाही. ही भाजी एका देठासारखी दिसते. महाराष्ट्रातल्या गावाकडच्या बाजारात ही भाजी मिळते. गुणांनी पौष्टिक असलेली ही रानभाजी केवळ सात ते दहा दिवसच उपलब्ध असते. या रानभाजीत आतड्यातील हानिकारक जीवाणू नष्ट करण्याची क्षमता असते. ही भाजी रोगप्रतिकारक शक्ती वाढवते. या भाजीत तंतूमय घटक जास्त असल्याने वजन कमी करण्यासाठी ही भाजी लाभदायक आहे. शेवळाची भाजी पोटाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. भाजीमुळे आतड्यातील चांगल्या जीवाणूंची संख्या वाढते. शेवळामधे जीवनसत्त्व, अँण्टिऑक्सिडण्टस आणि खनिजे असतात. यात ब-१२ आणि ड जीवनसत्त्वे मोठ्या प्रमाणात असतात. स्त्रियांच्या आरोग्यासाठी ही भाजी महत्त्वाची मानली जाते. शेवळाची भाजी करण्यासाठी शेवळाची एक जुडी, कांदे, लसूण, लाल मिरची, मीठ, तेल, मोहरी, हिंग, गरम मसाला, हळद, खोवलेले ओला नारळ एवढे जिन्नस लागतात. शेवळाची भाजी करताना देठाचा खालचा भाग काढून टाकावा आणि केवळ वरचा भागच घ्यावा.

## रिक्षाला अपघात एक जखमी

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील कशेळे-खांडस राज्यमार्ग रस्त्यावर अकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स या ठिकाणी असलेल्या वळणावर रिक्षाला अपघात झाला. या अपघातात रिक्षाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून एक प्रवासी जखमी झाला आहे.

कशेळे खांडस रस्त्यावर अकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स या ठिकाणी वळणावर अपघात झाला. त्या अपघातात रिक्षाचालकाचे वेगावर नियंत्रण राहिले नसल्याने अपघात ग्रस्त झाली. रिक्षा प्रवाशांसह जात असताना अपघातग्रस्त होताना रस्त्याच्या डाव्या बाजूला कोसळली. या अपघातात रिक्षाचे मोठे नुकसान झाले असून रिक्षामधून प्रवास करणारा प्रवासी गंभीर जखमी झाला आहे.

पुणे येथील देहू रोड येथील ही प्रवासी रिक्षा खांडस जवळील एका फार्म हाऊसकडे पर्यटकांना घेवून जात होती. या रिक्षाला झालेल्या अपघातात सुरेश दगडू वाघमारे हे प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर कशेळे येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार केल्यानंतर पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात दाखल केले आहे.

# पनवेलकडून विचुंबेकडे जाणारा भुयारी मार्ग सुरू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

तक्का गावाकडून विचुंबेकडे जाणारा भुयारी मार्ग सुरू करण्यात आला आहे. ऐन पावसाळ्यात हा मार्ग सुरू करण्यात आल्याने नवीन पनवेलकरांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. १३ जानेवारीपासून हा भुयारी मार्ग दुरुस्तीसाठी बंद करण्यात आला होता. हा मार्ग सुरू झाल्याने नवीन पनवेल उड्डाणपुलावरील वाहतुकीचा ताण काही प्रमाणात कमी होणार आहे. भुयारी मार्ग सुरू झाल्याने वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे.

पनवेल शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणावर पनवेलच्या पूर्व भागात झाला आहे. रेल्वे मार्गामुळे पूर्व भागातील विस्तार होणाऱ्या पनवेलला जोडण्यासाठी दोन पूल व एक भुयारी मार्गाची निर्मिती करण्यात आली आहे. विचुंबेकडून पनवेलला जाण्यासाठी आणि तक्काकडून विचुंबे, नवीन पनवेलला येण्यासाठी हा भुयारी मार्ग सोयीस्कर आहे. या भुयारी मार्गामुळे नवीन पनवेलमधील फायर ब्रिगेड, एचडीएफसी सर्कल मार्गाने पनवेल बस स्थानकावरील वाहतूक कोंडीचा सामना आता वाहनचालकांना करावा लागत नाही. या भुयारी मार्गावर रेल्वे ट्रॅकच्या दुपदरीकरणाचे काम करण्यासाठी सदरील मार्ग तीन महिन्यांसाठी बंद करण्यात आला होता. दोन ते तीन दिवसांपासून हा भुयारी मार्ग सुरू करण्यात आला आहे. पनवेलला जोडणाऱ्या उड्डाणपुलावर वाहतुकीवर ताण येत होता. याचा त्रास अनेक नागरिक, प्रवासी व वाहनचालकांना होत होता. हा भुयारी मार्ग पुन्हा सुरू झाल्याने वाहनचालकांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे नवीन पनवेल उड्डाणपुलावरील वाहतुकीचा ताण कमी झाला आहे.

## पान १ वरून

### ३.० मध्ये कुरबुरी

राज्यमंत्रीपदी बसवणे संयुक्तिक नसल्याने त्यांनी ही ऑफर नाकारली आहे. सुरुवातीला प्रफुल पटेल आणि सुनील तटकरे दोघांनाही मंत्रीपद पाहिजे, म्हणून त्यांच्या वाद झाल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. यावर तोडगा म्हणून एक कॅबिनेट आणि एक राज्यमंत्रीपद देण्याची मागणी पवार गटाने केली होती. भाजप राष्ट्रवादीला कॅबिनेट मंत्रीपद देण्यास तयार नसल्याच्याही बातम्या येत होत्या. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी नुकतीच पत्रकार परिषद घेत राष्ट्रवादीला नव्या सरकारच्या मंत्रीमंडळात का स्थान मिळाले नाही हे स्पष्ट केले. अजित पवार म्हणाले, मंत्रीपद प्रफ ुल्ल पटेलांना द्यायचे की सुनील तटकरेंना द्यायचे याबद्दल आमच्यामध्ये कोणताही वाद नाही. आम्ही सर्वांनी मिळून प्रफुल्ल पटेलांचे नाव निश्चित केले आहे. भाजपने आम्हाला राज्यमंत्रीपद देऊ केले होते. पण, प्रफुल पटेल यांनी यापूर्वी कॅबिनेट मंत्री म्हणून काम केले असल्यामुळे त्यांना पुन्हा राज्यमंत्रीपद देणे चुकीचे वाटते.

महाराष्ट्रातून अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादीला देखील मंत्रिपदाची संधी देण्यात आली होती. परंतु त्यांनी ती नाकारली आहे. आघाडी सरकारमध्ये सामील होणाऱ्या सर्वच पक्षांचा विचार करावा लागतो. कुण्या एका पक्षासाठी निकष मोडता येत नाही, पण येत्या काळात त्यांचा विचार नक्की होणार आहे. राष्ट्रवादीला संधी देण्यात आलेली आहे. परंतु त्यांनी ती स्वतःहून नाकारलेली आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. भाजपाला आधीच चंद्राबाबू नायडू आणि नितीश कुमार यांनी विविध अटी लादून जेरीस आणले आहे. हे कोठेही उघड झाले नसले तरी, त्यांच्यामध्ये कुरबुरी सुरु असल्याचे बोलले जाते. नायडू आणि नितीश हे दोघेही नेते संधीसाधू नेते म्हणून ओळखले जातात. नायड यांच्या पक्षाचे १६ तर नितीश कुमार यांच्या पक्षाचे १२ खासदार निवडून आले आहेत. भाजपानंतर नायडू यांच्या सर्वाधिक जागा निवडून आल्या आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून महत्वाची मंत्रालये मागण्यात येत असल्याचे सूत्रांनी सांगितले. नायडू यांचा इतिहास पाहिल्यास त्यांच्या मागण्या कधीच संपत नाही. तसेच नितीश कुमार कधी पलटी मारतील अशी भीती मोदी सरकारला आहे. त्यामुळे पुढील कालावधीत कुरबुरी वाढण्याची शक्यता अनेक राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केली आहे.

### किशोर जैन यांचा उमेदवारी अर्ज दाखल

कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत जैन यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्याने किशोर जैन हे भाजपाचे उमेदवार व विद्यमान आमदार निरंजन डावखरे यांच्यासमोर कडवे आव्हान उभे करणार असल्याचे यावेळी दिसून आले. यावेळी नागोठण्याचे माजी सरपंच डॉ. मिलिंद धात्रक, माजी उपसरपंच सुरेश जैन, शाखाप्रमुख धनंजय जगताप, संपर्क प्रमुख अनिल महाडिक, ग्रा.पं. सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, शैलेश रावकर, किर्तीकुमार कळस, माजी ग्रा.पं. सदस्या भक्ती जाधव आदींसह नागोठण्यातील कार्यकर्तेही यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या तत्वाने काम करताना किशोर जैन यांनी आजपर्यंत राजकारण, समाजकारण, शैक्षणिक अशा वेगवेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. नागोठणे ग्रामपंचायतीमध्ये एकहाती सत्ता स्थापन करुन रोल मॉडेल नागोठणेचा विषय असो की, विभागातील विकास कामे असोत अथवा आपल्या भारतीय एज्युकेशन सोसायटीमार्फत केजी टू पीजी पर्यंतचा शैक्षणिक सुविधा मिळवून देतांना शिक्षण सम्राट म्हणून त्यांचे कार्य असो, किशोर जैन यांनी सर्वच बाबतीत उल्लेखनीय कार्य केले आहे. शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी दिलेली जबाबदारी त्यांनी नेहमीच शिरस्तावर मानून कार्य केले आहे. यातूनच विधानसभेची निवडणूक लढविल्याचा अनुभव पाठीशी असलेले व संपूर्ण कोकणात दांडगा संपर्क असलेले किशोर जैन कोकण पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीतही खऱ्या अर्थाने रंगत आणतील असे बोलले जात आहे.

### माथेरानमध्ये पर्यावरणपूरक रिक्षा दाखल

पर्यावरणपूरक ई-रिक्षा चालविल्या जात आहेत.सध्या ई-रिक्षा यांचे दुसरा पायलट प्रकल्प राबविला जात आहे. माथेरान या ब्रिटिशांनी वसविलेल्या थंड हवेच्या ठिकाणी पर्यावरण राखण्यासाठी कोणत्याही वाहनांना परवानगी नाही.प्रदूषण रोखण्यासाठी ब्रिटिशांनी लागू केलेला नियम आजही कायम आहेत.माथेरान मधील विविध शाळेचे विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिक तसेच गरोदर महिला यांच्या सोयीसाठी पर्यावरणपूरक ई-रिक्षा असाव्यात म्हणून सर्वोच्च न्यायालयाने २०२२ मध्ये ई रिक्षा सुरु करण्यास परवानगी दिली आहे. माथेरानमधील हातरिक्षा चालक यांच्याकडून अमानवी पद्धतीने व्यक्तीला ओढून नेण्याची प्रथा दूर करावी यासाठी हात रिक्षा संघटना यांनी एक तप हा लढा दिला होता. श्रमिक हातरिक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदे हा लढा लढत होते. मात्र न्यायालयाच्या आदेशाने माथेरानमध्ये पर्यावरणपूरक ई-रिक्षा सुरू झाल्या पण त्यांचे स्टिअरिंग हे स्थानिक श्रमिकांच्या जाती नव्हते. त्यामुळे पुन्हा सर्वोच्च न्यायालयाला त्यात हस्तक्षेप करावा लागला होता.

पहिल्या टप्प्यात ई-रिक्षा चालविण्याची परवानगी दिली होती आणि त्यानंतर त्यासाठी निविदा काढली होती. माथेरान नगरपरिषदेकडून २० ई-रिक्षा खरेदी करण्यासाठी निविदा काढली आहे. त्यासाठी माथेरानमधील २४ हातरिक्षा चालकांनी निविदा भरल्या आहेत. सनियंत्रण समितीचे सदस्य सचिव रायगड जिल्हाधिकारी असून त्यांच्याकडून आलेल्या आदेशाने २७ मे रोजी सोडत घेण्यात आली. त्यानंतर रायगड जिल्हाधिकारी यांचे आदेशाने पर्यावरणपूरक ई-रिक्षा माथेरानमधील सोडत मध्ये नाव निघालेल्या २० हातरिक्षा चालक यांनी रिक्षा खरेदी केल्या आहेत. साधारण साडे तीन लाख रुपये किमतीच्या प्रत्येकी एक अशा २० ई-रिक्षा पनवेल येथून माथेरान येथे पोहचले आहेत. या रिक्षा खरेदी करण्यासाठी हातरिक्षा चालक यांना रंग दे या स्वयंसेवी संघटनेने अर्थ सहाय्य केले आहे. उद्या या ई-रिक्षा यांचे माथेरान पालिकेच्या पायलट प्रकल्प मध्ये समावेश होणार आहे. माथेरान पालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या पायलट प्रकल्पामध्ये आता नवीन २० ई-रिक्षा सहभागी होत असल्याने पर्यटक आणि स्थानिकांच्या सोयीसाठी आता २७ ई-रिक्षा दिमतीला असणार आहेत. त्यामुळे ई-रिक्षा कमी पडणार नाहीत अशी स्थिती नवीन ई-रिक्षा आल्याने निर्माण होणार आहे. उद्या सोमवारी या ई-रिक्षांचे लोकार्पण होणार असल्याची माहिती श्रमिक हात रिक्षा संघटनेचे अध्यक्ष प्रकाश सुतार सचिव सुनील शिंदे यांनी दिली आहे.

#### ४० हातरिक्षा चालकांकडे परवाने

**चालक यांच्याकडे आहेत. त्यामुळे त्या वाहन परवाना असलेल्या ३६ पैकी २० हातरिक्षा चालकांना रिक्षा खरेदी करण्याची परवानगी श्रमिक रिक्षा चालक संघटना यांच्या बैठकीत घेण्यात आला होता. माथेरानमध्ये ई-रिक्षा आणण्यासाठी श्रमिक हातरिक्षा संघटनेचे सचिव सुनील शिंदे यांनी न्यायालयीन लढाई लढली होती.**

### धनदांडग्यांसाठी ५ कोटींची संरक्षक भिंत

विलोभनीय समुद्र किनाऱ्याच्या पार्श्वभूमीवर धनदांडग्यांनी त्यांच्या मालमत्ता खरेदी केल्या आहेत. त्यांच्या मालमत्तांच्या रक्षणासाठी शासन ५ कोटीची संरक्षक भिंत का बांधत आहे? असा सवाल शिवसेना (उबाठा) जिल्हा युवासेना प्रमुख अमिर उर्फ पिंट्या ठाकूर यांनी केला आहे.शिवसेना (उबाठा) जिल्हा युवासेना प्रमुख अमिर उर्फ पिंट्या ठाकूर यांनी कार्यकारी अभियंता यांना ईमेल वरून पत्र पाठवून मुरूड तालुक्यातील भोईघर येथील संरक्षक भिंतींचे काम केवळ धनदांडग्यांच्या मालमत्तांच्या रक्षणासाठी तसेच अतिशय निकृष्ट दर्जाचे केले असल्याने हे काम करणाऱ्या ठेकेदाराला काळ्या यादीमध्ये टाकून सदर कामाचे देयक अदा न करण्याबाबत तक्रार दाखल केली आहे.

### कोकण पदवीधरसाठी उमेदवारांची 'भाऊगर्दी'

राष्ट्रवादी शरद पवार गट, काँग्रेस अशा प्रमुख पक्ष व गटांचे उमेदवार यांच्यासह २१ अपक्ष उमेदवारही मैदानात उतरले आहेत. विशेष म्हणजे शिवसेना शिंदे गटाचे माजी महापौर संजय मोरे यांनीही अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या सर्व इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केला आहे; मात्र माघारीनंतर नेमके किती शिलेदार कोकण सर करण्यासाठी रिंगणात राहणार, हे स्पष्ट होईल. लोकसभा निवडणुकीची धामधूम संपली असून आता विधान परिषदांच्या निवडणुकांचा धुरळा उडणार आहे. २६ जून रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. यात कोकण पदवीधर मतदारसंघाची निवडणूक चुरशीची होणार असल्याचे दिसते. या निवडणुकीत महायुती किंवा महाविकास आघाडी अशी लढत होणार नाही, तर प्रत्येक पक्ष व गट स्वतंत्र निवडणूक लढवत आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपचे विद्यमान आमदार निरंजन डावखरे यांनी आपला नामनिर्देशन अर्ज दाखल केला; तर त्यांच्यासमोर महायुती घटक पक्षाचे शिवसेना शिंदे गटाचे माजी महापौर संजय मोरे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार अमित सरैया, काँग्रेसचे स्थानिक नेते रमेश कीर, शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार किशोर जैन यांचे प्रमुख आव्हान आहे. याशिवाय समाजसेवक नागेश निमकर, कोचिंग क्लासेस संघटनेचे अमोल जगताप आणि गेल्या २९ वर्षांपासून सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सक्रिय असलेले गोकुळ पाटील यांच्यासह २१ अपक्ष उमेदवारही निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

### पांडियन यांचा राजकीय संन्यास

७८ जागांवर विजय मिळवत पाचवेळा मुख्यमंत्री पटनायक यांची सत्तेतून हकालपट्टी केली आहे. बीजेडीला केवळ ५१ जागा मिळाल्या आहेत. पक्षाच्या पराभवाचे कारण पांडियन यांच्यावर ठपका ठेवला जात होता. पक्षातील त्यांच्या वर्चस्वामुळे स्थानिक नेते नाराज होते. वरिष्ठ नेतेही पांडियन यांच्याबद्दल खूश नव्हते. त्याचवेळी पांडियन यांना पटनायक यांचे उत्तराधिकारीही म्हटले जात होते. तामिळनाडूत जन्मलेल्या व्हीके पांडियन यांना भाजपने ओडिशाच्या राजकारणात 'बाहेरचे' संबोधले आहे.

# आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते मनुस्मृतीचे दहन होणार

**। पाली-बेणसे । वार्ताहर ।**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या धर्मामध्ये माणसाला माणूस बनण्याचा अधिकार नाही. अशा मनस्मृतीचे दहन २५ डिसेंबर १९२७ साली महाडच्या क्रांती भूमीमध्ये केले होते. त्याच म नुस्मृतीचे पुन्हा दहन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सोमवारी १० जून रोजी सकाळी १२ वाजता महाड येथे क्रांतीभूमीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

ज्या मनुस्मृती मुळे हा संपूर्ण देश जगातील सर्वात मागासलेला देश ओळखला गेला, ज्या मनुस्मृतीने माणसा माणसात भेद निर्माण करून गलिच्छ आणि विकृत अशी जाती व्यवस्था निर्माण केली, वर्ण व्यवस्थेद्वारे या देशातील बहुजन समाजावर जनावराप्रमाणे जगण्याची परिस्थिती आणली आणि ज्या मनुस्मृतीला क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले यांनी जाळण्याच्या लायकीचा ग्रंथ असे म्हटले होते. ज्योतिबा फुले यांचे म्हणणे खरे करून दाखवणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी २५ डिसेंबर १९२७ साली या विकृत पुस्तकाची जाहीर होळी केली होती. या देशातील बहुजन समाजाच्या हजारो वर्षाच्या मानवी गुलामाच्या बेड्या तोडल्या आणि नवीन संविधान निर्माण करून सर्वांना समता स्वातंत्र्य आणि बंधुता निर्माण करून हक्क आणि अधिकार दिले. त्या मनुस्मृतीला या पुरोगामी राज्याचे प्रतिगामी मुख्यमंत्री आणि त्यांचे शिक्षण मंत्री शालेय शिक्षणात समाविष्ट करू पाहताहेत त्यांचा आणि त्यांच्या विकृत मानसिकतेचा निषेध करण्यात येणार आहे. महाड येथील क्रांतिभूमी येथे सर्व वैचारिक बुद्धिवादी संघटना एकत्र येऊन या मनुस्मृतीची पुन्हा जाहीर होळी करणार आहेत.

## २ लाखांचा मुद्देमाल लंपास

**। पनवेल । वार्ताहर ।**

एका उभ्या गाडीच्या काचा फोडून अज्ञात चोरट्यांनी आतील २ लाख ४० हजाराचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये दिपक फर्टीलायझर कंपनीसमोरील रस्त्यावर घडली आहे.

संजय भोईर यांनी त्यांची गाडी उभी ठेवून ते कामानिमित्त बाजूला गेले असताना अज्ञात चोरट्यांनी त्या दरम्यान त्यांच्या गाडीच्या डाव्या बाजूची काच फोडून गाडीतील २ लाख रुपये रोख रक्कम व ४० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे ब्रेसलेट चोरुन नेले आहे. याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात केली आहे.

# तळा तालुक्यात खरिपाचे क्षेत्र घटले

**। तळा । वार्ताहर ।**

तळा तालुका हा डोंगराळ दुर्गम व काही भागाला लाभलेला खाडी किनारा आहे. या भागात खडकाळ वरकस व थोड्या प्रमाणात खाडीची शेती असून अंदाजे सरासरी खरीप हंगामात २३४० हेक्टर क्षेत्र हे भात लागवड योग्य क्षेत्र आहे. २०२३ मधे १५५० हेक्टर क्षेत्रावर खरीप हंगामात भातशेतीची लागवड करण्यात आली होती. गेल्या तीन वर्षांच्या मानाने ३४% भात क्षेत्राची लागवड कमी झाली तरीही भाताच्या उत्पादनात ५ ते १० टक्के वाढ झाली आहे. याचे कारण कृषी विभागाचे मार्गदर्शन, नव तंत्रज्ञान व नवनवीन भाताच्या अधिक उत्पादन देणाऱ्या जाती. याचा हा उत्पादन वाढीस लाभ झाला आहे.

अवकाळी पाऊस, मजूरांचा अभाव, मजूरीत होणारी वाढ व स्थलांतर या कारणांमुळे खरीप हंगामातील भात शेती लागवडीचे क्षेत्र घटत आहे. भातशेती क्षेत्रात घट होत असल्याने एक प्रश्न समोर उभा रहात आहे. कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी

योजना व उत्पादन अधिक वाढीसाठी व बागायती शेती व कडधान्ये इत्यादी लागवडी बाबत व नाचणी वरीचे लागवडीचे क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. गेल्या दोन वर्षांत विविध यांत्रिक पध्दतीने शेती करणे, नवनवीन पध्दतींचा वापर करून शेती करणे याचा वापर करण्यात येत आहे. यावर्षी खरीप हंगामातील शेतीक्षेत्र वाढविण्याकडे कल असल्याचे पहावयास मिळत आहे. तालुक्यात पुर्वी नाचणीचे पीक मोठ्याप्रमाणात घेतले जायचे येथील डोंगर उतारावर नाचणीची लागवड होत होती.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे चांदई, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे तिचे मालक शिवराम बापु बागडे यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १२ | ९ | ०-०१-३० | ०=०६ |
| १२ | १० | ०-०८-६० | ०=५९ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० (दहा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०९/०६/२०२४

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४,९२७१८६९२०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावरही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे-शिलार, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.पॉ. | रुपये | पैसे |
| अनिल गोमा पाटील | ४५ | २ | ०-४२-०० | ० | ३७ |
| | या पैकी लिहून देणार यांचे मालकीचे विक्री केलेले क्षेत्र ०-२१-०० मात्र. | | | | |

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

कार्यालयीन पत्ता :- मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्यासमोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
**ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
दिनांक :- ०९/०६/२०२४
मो.नं. ९१५८२७७७२८

**निवडक**

## पोलीस पाटलांची बैठक

**पनवेल :** आगामी वटपोर्णिमा व बकरी ईदसह इतर सण व उत्सवानिमित्त पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हद्दीतील पोलीस पाटलांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील पोलीस पाटील यांची मासिक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर व गोपनिय विभागाचे अधिकारी कुवर यांनी उपस्थित पोलीस पाटील यांना महत्वाची माहिती व सूचना केल्या.

## बाजारपेठेत आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल शहरातील बाजारपेठ येथील एका दुकानासमोर एका इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ४० ते ५० वर्षे आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी २७४५२३३३ किंवा पोलीस उपनिरीक्षक संजय अस्पतराव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पनवेल शहर पोलीस ठाणे यांनी केले आहे.

## कामोठ्यातून तरुण बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक २२ वर्षीय तरुण राहत्या घरातून कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. रामकृष्ण अनंत बोरा असे तरूणाचे नाव आहे. चेहरा गोल, केस काळे बारिक, नाक सरळ, डोळे काळे, वर्ण सावळा, बांधा मध्यम, अंगात मोरपंखी रंगाचा टी-शर्ट व काळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट घातलेली आहे. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास कामोठे पोलीस ठाणे किंवा पो.हवा.एच.एस.शेलार यांच्याशी संपर्क साधावा.

## महिलेची केली फसवणूक

**पनवेल :** विविध फोनवरील व्हॉटसअप ग्रुप आणि एक्युआर-सी या अॅपच्या माध्यमातून एका महिलेची ऑनलाईन ट्रेडींगच्या नावे २५ लाखांची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे. शहरातील मंजिरी जोशी यांना शेअर बाजारातील ऑनलाईन ट्रेडींगच्या माध्यमातून अधिकचा नफा मिळवून देण्याचे आमिष अज्ञात भामट्याने दिले. यासाठी त्यांना वेगवेगळ्या बँक खात्यात रक्कम जमा करण्याच्या सूचना देण्यात आल्या. त्यानुसार त्यांनी ऑनलाईन पद्धतीने जवळपास २५ लाख रुपये जमा केले.

## १९ लाखांची फसवणूक

**पनवेल :** पोलीस असल्याची बतावणी करून एकाची १९ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना कामोठे परिसरात घडली आहे.कामोठे वसाहतीत राहणारे रोहित चव्हाण यांना एका फोनद्वारे आम्ही पोलीस अधिकारी आहोत. तुम्ही पाठविलेल्या मुंबई ते इराण या आंतरराष्ट्रीय कुरिअरमध्ये पीसीटी नावाचे अंमली पदार्थ जप्त केले आहे. स्काईप हे अॅप डाऊनलोड करताना रोहित यांना आधारकार्ड, डेबिट कार्डची माहिती व इतर वैयक्तिक माहिती भरण्यास सांगून फसवणूक केली.

# ७४ अनधिकृत फलक पाडले

### जाहिरात फलकांवर सिडकोची कारवाई; जाहिरात फलक उभारणीसाठी परवानगीचे आदेश

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

सिडको महामंडळातर्फे नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्रातील ९४ गावांमध्ये बेकायदेशीर व अनधिकृतरीत्या उभारण्यात आलेल्या जाहिरात फलकांवर धडक कारवाई करण्यास सुरूवात करण्यात आली असून ७४ फलक काढून टाकण्यात आले आहेत. या कारवाईविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केलेल्या जाहिरात कंपन्यांच्या याचिका फेटाळून लावताना नैना क्षेत्रामध्ये जाहिरात फलक उभारण्यासाठी सिडकोची परवानगी घेण्याबाबतचे आदेशही उच्च न्यायालयाने दिले आहेत.




या संदर्भात सिडकोने यापूर्वी जाहीर सूचना प्रसिद्ध करून अनधिकृत जाहिरात फलक काढून टाकण्याचे आवाहन संबंधित फलकधारकांना केले होते. तसेच संबंधित फलकधारक, जाहिरात संस्था यांना अनधिकृत जाहिरात फलक काढून टाकण्याबाबत एमआरटीपी कायद्या अंतर्गत नोटीसीही बजावण्यात आल्या होत्या.

सिडकोतर्फे रायगड जिल्ह्याच्या पनवेल तालुक्यातील ९२ व उरण तालुक्यातील २ याप्रमाणे ९४ गावांतील अधिसूचित क्षेत्रामध्ये नैना शहर विकसित करण्यात येत आहे. नैना क्षेत्राकरिता सिडको विशेष नियोजन प्राधिकरण आहे. नैना विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३० प्रमाणे नैना क्षेत्रात कोणत्याही प्रकारचे जाहिरात फलक उभारण्यासाठी परवानगी देण्याचे अधिकार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोच्या बांधकाम परवानगी विभाग, नैना यांना आहेत.

अनधिकृत जाहिरात फलक काढून टाकण्यासंदर्भातील जाहीर सूचना २४ मे रोजी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्यात येऊन अनधिकृत फलकधारकांना फलक काढून टाकण्यासाठी २४ तासांचा अवधी देण्यात आला होता. तसेच संबंधित फलकधारकांना सदर फलक काढून टाकण्यासाठी नोटीसाही बजावण्यात आल्या होत्या. हा कालावधी उलटून गेल्यानंतर सिडकोतर्फे नैना क्षेत्रातील पळस्पे फाटा, मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई - पुणे महामार्ग, पनवेल माथेरान रोड येथे कारवाई करण्यात येऊन ७४ अनधिकृत फलक काढून टाकण्यात आले.

कारवाई टाळण्यासाठी संबंधित जाहिरात कंपन्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. परंतु, मुंबई उच्च न्यायालयातर्फे या कंपन्यांच्या याचिक फेटाळून लावण्यात आल्या. सदर कंपन्यांनी पुढील चार आठवड्यांत अनधिकृत फलक काढून टाकण्याचे आदेशही उच्च न्यायालयाने दिले. या आदेशान्वये सदर फलक काढून टाकल्यानंतर त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र या जाहिरात कंपन्यांनी सिडकोला देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच सिडेकोच्या नैना अधिसूचित क्षेत्रासाठी तयार करण्यात आलेल्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार नैना क्षेत्रामध्ये नियोजन विभागाची परवानगी घेऊन फलक उभारण्याची मुभा उच्च न्यायालयाने सदर याचिकाकर्त्यांना दिली आहे.

# पाचवर्षानंतरही शासनाचे आदेश बासनात

- अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी
- दारू दुकाने व बारला देवता-राष्ट्रपुरुषांची नावे!

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अनेक वर्षांच्या पाठपुराव्यानंतर श्रद्धास्थानांचा सन्मान राखण्यासाठी महाराष्ट्र सरकारने दारू दुकाने, बियर बार यांना देण्यात आलेली देवीदेवता, राष्ट्रपुरुष, संत, गड-किल्ले यांची नावे बदलण्यात यावी म्हणून ४ जून २०१९ या दिवशी शासन आदेश काढला; मात्र ५ वर्षे झाली, तरी मुंबईतील ३१८ मद्यालये आणि बार यांपैकी २०८ म्हणजे ६५ टक्के दुकानांना देवता आणि राष्ट्रपुरुष यांची नावे असल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे.

शासनाच्या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याऐवजी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी चक्क सदर आदेशच मागे घेण्यासाठी शिफारस केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.



भाविक, राष्ट्रप्रेमी आणि शिवप्रेमी यांच्या श्रद्धेचा सन्मान राखण्याऐवजी बार मालकांची वकिली करणाऱ्या उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी,अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागले, असा इशारा हिंदु जनजागृती समितीने दिला आहे.

५ वर्षांनंतरही वेळ लागेल म्हणून कार्यवाही करता येणार नाही, असे उत्पादन शुल्क विभागाचे म्हणणे न पटणारे आहे. नियमाची अंमलबजावणी करणे हे अधिकाऱ्यांवर बंधनकारक आहे. त्यामुळे उत्पादन शुल्क विभागाने वकिली न करता शासनाच्या आदेशानुसार कठोर कार्यवाही करावी. राज्यभरात शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी करावी, असे समितीने पत्रात म्हटले आहे.

# माथेरानमध्ये निसर्गाचे बदलते रूप

**। माथेरान । वार्ताहर ।**

दोन महिने उन्हाच्या काहिलीने त्रस्त झालेल्या पर्यटक आणि नागरिकांना निसर्गाच्या बदलत्या रुपामुळे कमालीचा थंडावा मिळाला आहे. माथेरानमध्ये सकाळच्या वेळी धुके दाटत असल्यामुळे निसर्गाचे बदलते रूप पहावयास मिळत आहे.



मुंबई-पुण्यापासून अगदी जवळचे पर्यटनस्थळ असल्याने उन्हाळी पर्यटन हंगामासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणात येथे आले होते. एप्रिल आणि मे महिना उन्हामुळे गरमी जाणवत होती त्यापासून राहत मिळविण्यासाठी माथेरान पर्यटनस्थळ योग्य डेस्टिनेशन म्हणून पर्यटकांनी पसंती दिली. उंच, गर्द हिरव्या वनराईमुळे गरमीचे प्रमाण अत्यल्प होते. जरी गर्मी कमी प्रमाणात जाणवली तरी या वर्षी प्रथमच माथेरानचे तापमान ३७ अंशावर जाऊन पोहोचले होते. शाळा सुरू झाल्यानंतर माथेरानचा पर्यटन हंगाम काही प्रमाणात कमी होणार असला तरी निसर्गाचे वेगळे रूप पाहण्याची संधी येथे उन्हाळी पर्यटन हंगामाच्या शेवटीला दाखल झालेल्या पर्यटकांना मिळाली. गेल्या दोन दिवसांपासून सकाळी धुक्याची चादर सर्वत्र पसरली असून वातावरणात तर कमालीचा गारवा अनुभवण्यास मिळत आहे. विकेंडला आलेले पर्यटक यांना पावसाबरोबरच निसर्गाचे बदलते रूप आणि मनमोहक दृश्य पहावयास मिळाले.यामुळे सध्या माथेरान पर्यटन स्थळी असलेले पर्यटक आनंदी असल्याचे चित्र आहे. आता काही दिवसात माथेरान डोंगरमाथ्यावर जोरदार पावसाची सुरूवात होणार अशी चाहूल हा निसर्ग देतो आहे.

# उमरोली जलजीवन योजनेची चौकशी करावी

### मनसेची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे मागणी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील उमरोली ग्रामपंचायत हद्दीतील गावांसाठी नळपाणी योजना राबविली जात आहे. जलजीवन मिशन मधून राबविण्यात येत असलेल्या या योजनेचे काम अत्यंत संथगतीने सुरु आहे. त्याचवेळी जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून काम ५० टक्के हुन अधिक पेमेंट अदा करण्यात आले आहे. त्यामुळे संथगतीने सुरु असलेल्या कामाबद्दल आणि निधी लाटण्याचा प्रकार उमरोली नळपाणी योजनेच्या कामात सुरु आहे.



त्यामुळे या योजनेचे काम पाहणारे जीवन प्राधिकरण आणि संबंधित योजनेचे काम करणारे ठेकेदार यांची चौकशी करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली आहे, दरम्यान, कर्जत तालुक्यातील या योजनेचे ठेकेदार यांची चौकशी करून ठेकेदाराला काळया यादीत टाकण्यात यावे अशी मागणी मनसेचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी केली आहे.

उमरोली ग्रामपंचायत हद्दी मध्ये जल मिशन योजनेच्या कामाचे उद्घाटन होऊन वर्ष होऊन गेले आहे. योजनेमधील बहुसंख्य कामे अपूर्ण स्थितीत आहेत. उमरोली ग्रामपंचायत हद्दीमधील प्रत्येक गावात जलकुंभ बांधण्यात येणार होती. आजपर्यंत कुठेही कामाची सुरुवात दिसून येत नाही. पाईपलाईन अर्धवट स्थितीत टाकण्यात आलेली आहे. तसेच जलवाहिनी टाकताना



नियम पायदळी तुडवून रस्त्याची नासधूस करून टाकलेल्या आहेत. कोषाणे या गावांमध्ये जलमिशन योजनेच्या पाईपलाईन जमिनीवरती ठेवण्यात आली आहे. त्याची चौकशी करण्यात यावी. शासनाने करोडो रुपये व्यर्थ घालवून संबंधित नळपाणी योजनेचे ठेकेदार चुकीच्या पध्दतीने काम करत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यात नळपाणी योजनेत अंतरभूत असलेल्या एकाही जलकुंभाचे काम अर्धेदेखील पूर्ण झालेले नाही.

नळपाणी योजनेच्या ठेकेदाराने केलेली कामे तसेच त्या कामांची सर्वेक्षण न करता बिले अदा केली आहेत. त्या सर्व कामांची चौकशी करण्यात यावी आणि प्राधिकरणाच्या अधिकारी वर्गाने ते पेमेंट अदा करताना कामे पूर्ण झाली आहेत किंवा नाही याची खात्री केली नाही. त्यामुळे जीवन प्राधिकरणाचे अधिकाऱ्यांची देखील चौकशी करण्याची मागणी मनसेचे जिल्हा अध्यक्ष जितेंद्र पाटील यांनी केली आहे.

# कर्जत नेरळ राज्यमार्गावरील सहा दुकाने फोडली

**। नेरळ । प्रतिनिधी।**

कर्जत नेरळ राज्यमार्ग रस्त्यावरील सहा दुकाने रात्री चोरट्यांनी फोडली.या घटनेत किरकोळ वस्तूंची चोरी झाली असून दहशत माजवण्यासाठी या चोरीच्या घटना घडल्या असल्याचे बोलले जात आहे.

देऊलवाडी स्टॉप जवळील, डी मार्ट समोरील एकूण पाच दुकाने आणि वांजले येथील हडप वडापाव असे एकूण सहा दुकाने चोरट्यांनी फोडलेली आहेत. शुक्रवारी तीन वाजण्याच्या सुमारास पाच ते सहा जणांनी मोटार सायकलवरून येऊन शटर उखडून चोरी केली आहे. यामध्ये आपले सरकार सेवा केंद्रांमधून, मैत्रीण ब्युटी पार्लरमधील, गादी कारखाना, केक शॉप तसेच वांजले येथील हडप वडापाव या दुकानांमधून रोख तर काही ठिकाणी किरकोळ ऐवज चोरीला गेला आहे.

दरम्यान कर्जत पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला असून कर्जत पोलीस ठाण्याच्या वतीने अधिक तपास सुरू आहे. अलीकडे सोनसाखळी चोरीची घटना ताजी असताना आणि दिवसेंदिवस वाढत्या चोरीचे प्रमाण लक्षात घेता कर्जत पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.



● मुरुड समुद्रकिनारी रविवारची सुट्टी किनारी सुशोभीकरण झाल्याने पार्किंगच्या पायऱ्यांवर बसून लाटांचा आनंद घेताना पर्यटक दिसत आहेत. (छाया -सुधीर नाझरे)

# श्रीनिवास गडकरी यांना साहित्य रत्न पुरस्कार जाहीर

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

एस फोर सोलुशन्स या अग्रगण्य प्रकाशन संस्थेतर्फे दिला जाणारा मानाचा साहित्य रत्न पुरस्कार नुकताच पेणचे नामवंत साहित्यिक श्रीनिवास गडकरी यांना जाहीर झाला आहे. साहित्य, पत्रकारिता व काव्य क्षेत्रातील भरीव योगदाना बद्दल त्याना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

विविध विषयांवरील त्यांची एकूण पंचवीस पुस्तके प्रसिद्ध आहेत. साऱ्या पुस्तकात हाताळलेले वेगळे विषय, त्याचा साहित्यिक दर्जा व गुणवत्ता या पुरस्कारासाठी विचारात घेतली गेली. आघाडीच्या मराठी वृत्तपत्रासाठी काम करतं असताना त्यांनी सतत सामाजिक प्रश्न पोटतिडकीने मांडले. त्यांच्या अनेक पुस्तकांना विविध पुरस्कार तर तब्बल तीन पुस्तकांना शासकीय शिफारस मिळाली आहे.

आपल्या पुरस्काराविषयी बोलताना गडकरी म्हणाले की, नोकरी, उद्योग सांभाळून पत्रकारीता लेखन करीत असताना अतिशय कष्ट पडले. तारेवरची कसरत करावी लागली. त्याचे आज फळं मिळाले आहे. या पुढे माझ्या लेखनाला अधिक बळ मिळेल, असे श्रीनिवास गडकरी यांनी सांगितले.

# माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**। खांब ।वार्ताहर ।**

शिक्षण घेतलेले विद्यार्थी,_ विद्यार्थिनीनोकरी, व्यवसाय, उद्योग व विवाह झाल्यामुळे मुलाबाळांसह संसारात गुंतलेल्या असतात. परंतु त्यांना आपल्या बालपणाची व शालेय जीवनाची आठवण येते. रोहा येथील को.ए.सो.च्या मेहेंदळे हायस्कूलमध्ये १९९७-९८ साली दहावीच्या वर्गात शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनीचे २६ वर्षानंतर स्नेहसंमेलन आयोजित केले होते.



रोहा येथील निसर्गरम्य अशा तांबडी भागातील नक्षत्र फार्म हाऊस येथे निरनिराळ्या मुंबई, पनवेल, अलिबाग, पुणे, चौल, रेवदंडा, बोरिवली, ठाणे आदी शहरातील मुले एकत्र जमली. शाळेत असताना आणि शिक्षण घेताना सरांचे ओरडणे, रागावणे, वेळप्रसंगी छडीचा धाक तितकेच शिकवताना त्यांची मेहनत आज आमच्या डोळ्यासमोरून जात नाही. या आठवणी नेहमी उजाळा देत असतात. सामुदायिक भोजन, गप्पा , मनोरंजन, किस्से, त्यावेळचा नकलीपणा अगदी सर्वांनाच भावत होता.

आता जरी व्यवसायात उद्योग, नोकरीनिमित्त आणि सर्व संसारात गुंतले असले तरी त्या आठवणींनी सर्वांचे डोळे पाणवले. काहींना रडूदेखील आवरत नव्हते. अशा प्रकारे आपले कार्यक्रम वर्षभरात झाले पाहिजेत, असे सर्वांनी ठरविले. जीवनात असे प्रसंग नेहमी येत नाहीत. परंतु आठवणी कायम साठवून ठेवल्या जातात. गुरुवर्य बी. आर. भादेकर यांना देखील हा कार्यक्रम पाहून अतिशय आनंद झाला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भालचंद्र पवार, राजेश काफरे, शिवाजी पाटील विश्वजित लूमण यांनी उत्कृष्ट नियोजन केले.

# प्रवासात सुट्ट्या पैशांची चिंता नको

### एसटीमध्ये युपीआय प्रणालीला भरघोस प्रतिसाद

**। रायगड । प्रतिनिधी ।**

एसटीतून प्रवास करताना प्रवाशांना आता तिकिटासाठी सुट्ट्या पैशांची चिंता नको. एसटी महामंडळाने एक पाऊल पुढे टाकत प्रवाशांना युपीआय प्रणालीद्वारे तिकिट खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. त्यासाठी सर्व वाहकांसाठी अँड्राईड तिकीट इश्यू मशिन्स नव्याने सेवेत दाखल केल्या आहेत. या मशिनमुळे प्रवाशांना प्रवासादरम्यान रोख पैशांऐवजी युपीआय, क्युआर कोड, आदी डिजिटल पेमेंटचा वापर करत तिकिट काढता येते. जानेवारी २०२४ ते मे २०२४ अखेर १४ लाख ३२ हजार तिकीटांची विक्री झाली असून यातून गेल्या ५ महिन्यात ३५ कोटी ८७ लाख १५ हजार रुपये उत्पन्न मिळाले आहे.

निश्चलनीकरणाच्या दृष्टीकोनातून एसटी महामंडळाने एक पाऊल पुढे टाकत प्रवासादरम्यान प्रवाशांना बसमध्ये तिकिट काढण्यासाठी फोन पे, गुगल पे सारख्या युपीआय पेमेंटची सुविधा उपलब्ध करून दिली. वाहकाच्या अँड्राईड तिकिट मशीनवर असलेल्या क्युआर कोडद्वारे प्रवाशांना तिकीटाचे मोजके पैसे डिजिटल स्वरूपात देणे शक्य आहे. अर्थात, प्रवाशांना या सुविधेमुळे खिशात रोख पैसे नाहीत तसेच सुट्ट्या पैशासाठी वाहकासोबत होणारा वाद असे प्रश्न कायमचे मिटले आहेत. या सहज आणि सुलभ तिकीट प्रणालीला प्रवाशांनी भरघोस प्रतिसाद दिला असून जानेवारी २०२४ मध्ये प्रतिदिन केवळ ३ हजार ५०० तिकीटे युपीआयद्वारे काढली जात होती. त्यामध्ये मे, २०२४ मध्ये पाचपट वाढ होऊन प्रतिदिन २० हजार ४०० तिकीटे सरासरी काढली जात आहेत. अर्थात, युपीआय पेमेंटव्दारे महामंडळाच्या खात्यावर पैसे जमा होण्याचे प्रमाण देखील वाढले असून ते जानेवारी २०२४ मध्ये प्रतिदिन १० लाख रुपये होते, आता मे २०२४ मध्ये ४५ लाख रूपये प्रतिदिन झाले आहे.




प्रवाशांनी प्रवासादरम्यान नेहमी वाहकाकडे युपीआय तिकीटाची मागणी करावी जेणेकरून सुट्या पैशावरून होणारे वादविवाद टाळले जातील. सहाजिकच आपला प्रवास सुखकर व समाधानकारक होईल. युपीआय पेमेंटव्दारे क्युआर कोडच्या माध्यमातून एसटीच्या सर्व प्रकारच्या बस सेवेमध्ये तिकीट विक्री सुरू केली असून जास्तीत जास्त प्रवाशांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**युपीआय पेमेंटव्दारे प्राप्त उत्पन्न विवरण**

जानेवारीमध्ये १०९४९६ तिकीट खरेदीतून ३,१२,८७,२७७ रूपये, फेब्रुवारी महिन्यात १३३१५७ तिकीट खरेदीतून ४,१०,७०,९४१ रूपये, मार्चमध्ये २०५९६१ तिकीट खरेदीतून ५,८६,५०,७८७ रूपये, एप्रिल महिन्यात ३५०७३६ तिकीट खरेदीतून ८,७५,२३,९१० रूपये, मे महिन्यात ६३२६९० तिकीट खरेदीतून १४,०१,८२,७०७ रूपये असा एकूण पाच महिन्यात १४३२०४० तिकीट खरेदीतून ३५,८७,१५,६२२ रूपयांचे उत्पन्न एसटी महामंडळाला मिळाले आहे.

# आयुष्याशी खेळ थांबवा

सुमारे सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वी बीए परिक्षेचे तपासायला गेलेले पेपर जळले होते. त्यामुळे सरसकट सर्वांना पास करण्यात आले होते. त्या वर्षीच्या बीए पास झालेल्यांना जळके बीए म्हणून ओळखले जाई. यंदा नीटच्या परिक्षेचा पेपर फुटणे व तत्सम जे घोळ झाले आहेत त्यामुळे यंदाच्या उत्तीर्णांमधून डॉक्टर होणाऱ्यांना कोणी फुटके डॉक्टर असे विशेषण लावले तर नवल वाटू नये. यातील गमतीचा भाग सोडला तरी या निमित्ताने देशात उच्च शिक्षणाचा जो बट्ट्याबोळ झाला आहे त्याचा गंभीरपणे विचार करायला हवा. जेमतेम १७-१८ वयाच्या अत्यंत बुध्दिमान अशा लाखो मुलांच्या भवितव्याशी सालोसाल होणारा हा खेळ थांबवायला हवा. यंदाच्या परिक्षेला चोवीस लाख विद्यार्थी बसले होते. देशातल्या ५७१ शहरांमध्ये आणि परदेशात दुबई वगैरे शहरांमध्ये तेरा ठिकाणी याची केंद्रे असतात. नीटच्या या परिक्षांमधून देशातील वैद्यकीय किंवा डॉक्टरकीच्या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळतो. आणि, देशात डॉक्टर किंवा इंजिनिअर होणे हेच आपल्या आयुष्याचे इतिकर्तव्य मानण्याची पद्धत आहे. प्रत्यक्षात देशभभरातील सातशे मेडिकल कॉलेजेसमध्ये केवळ एक लाख आठ हजार ९४० जागा असतात. म्हणजे एका जागेसाठी चोवीस विद्यार्थी धडपडत असतात. यातही सरकारी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवणे हे अनेकांचे स्वप्न असते. कारण, एक तर त्यांचा दर्जा चांगला असतो आणि मुख्यतः त्यांची फी कितीतरी कमी असते. अर्थात, अलिकडे सरकारी कॉलेजांमधील वैद्यकीय शिक्षणही गरिबांच्या आवाक्याच्या बाहेर गेले आहे. मात्र शिष्यवृत्ती, कर्ज अशी काहीतरी व्यवस्था करून इथे प्रवेश घेतला जाऊ शकतो. खासगी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळाला तरीही तेथील एकेका वर्षाची फी पाच, दहा, पंचवीस लाख असू शकते. इथे प्रवेश घेण्याची कल्पनाही सामान्य घरातील विद्यार्थी करू शकत नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात परवडतील अशा जागा खरे तर कमी असतात.

### पर्याय शोधायला हवेत

एकेका जागेसाठी होणारी ही जीवघेणी स्पर्धा लक्षात घेऊन दिवसेंदिवस नीटच्या परीक्षा भयानक कठीण होऊ लागल्या आहेत. त्यासाठी विद्यार्थी आठवी, नववीपासूनच अभ्यास करायला जुंपले जातात. इतके करून यशाची खात्री नसते. डॉक्टर होण्याच्या महत्वाकांक्षेने दिवसरात्र परिश्रम केल्यानंतर एक किंवा दोन वा पाच गुणांपायी ते स्वप्न सोडून द्यायला लागणे यातील दुःख ते विद्यार्थी व त्यांचे पालक यांनाच कळू शकेल. यानंतर या विद्यार्थ्यांनी दुसरी कुठलीही करियर निवडली तरी ती त्यांच्या मनासारखी व त्यांच्या गुणांना वाव देणारी असेलच याची खात्री देता येत नाही. या निराशेपायी अनेक मुले आत्महत्या करतात. कित्येक जणांचे आयुष्य दिशाहीन होते. अशी ही अमानुष व्यवस्था जगाच्या पाठीवर दुसरीकडे क्वचितच कुठे असेल. मेडिकल कॉलेजेसची व त्यातील जागांची संख्या वाढवणे हा यावरचा पर्याय ठरू शकत नाही. कारण, भारतासारख्या एकशेचाळीस कोटी लोकसंख्येच्या देशात अशा जागा कमीच पडत राहणार. त्यासाठी डॉक्टरकीभोवती असलेले वलय कमी करणे आवश्यक आहे. या संदर्भात अनेक सूचना यापूर्वी करण्यात आलेल्या आहेत. ग्रामीण भागात अतिउच्च शिक्षण घेतलेले व एखाद्या विषयात स्पेशलायझेशन केलेल्या डॉक्टरांची गरज कमी असते. काही ठराविक प्रकारचे आजार तेथे अधिक असतात. त्यामुळे वैद्यकीय शिक्षणाचे डिप्लोमा किंवा छोटे अभ्यासक्रम सुरू करून ते पास झालेल्यांना ग्रामीण किंवा शहरी भागात मर्यादित प्रॅक्टिस करण्याची परवानगी देण्यात यावी असे काहींचे मत आहे. भारतासारख्या देशात याचा दुरुपयोग करणारे गुन्हेगारी स्वरुपाचे लोक असू शकतात. सध्यादेखील बनावट डॉक्टरांचा सुळसुळाट झालेला आहेच. पण असे गुन्हे करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवणारी व्यवस्था निर्माण करणे हाच मार्ग आहे. यंदाच्या परिक्षेतील घोटाळ्यानंतर तात्पुरत्या उपाययोजना न करता दूरगामी मार्ग काढण्याकडे अधिक लक्ष दिले जायला हवे. इंजिनिअरिंग व डॉक्टरकी यापलिकडे समाजाला उपयुक्त असलेले जे पेशे आहेत त्यातील लोकांना भरपूर पैसे व मानसन्मान मिळेल हेही पाहायला हवे.

### भानगडींची चौकशी हवी

दरम्यान, यंदाच्या परिक्षेतील गडबडींचीही नीट चौकशी करून कठोर शासन केले जायला हवे. यंदाच्या नीटच्या परिक्षेचे पेपर फुटले होते असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. बिहार पोलिसांनी काही जणांकडून परिक्षेचे प्रवेशपत्र, पोस्टडेटेड चेक्स इत्यादी जप्त केले आहेत. मात्र पेपर फुटले होते हे सिध्द करण्याला हे पुरावे पुरेसे नाहीत असे नीट परीक्षा आयोजकांचे म्हणणे आहे. याखेरीज राजस्थानातील सवाई माधोपूर येथे हिंदी माध्यमातून परीक्षा देणाऱ्यांना इंग्रजी माध्यमाचा पेपर देण्यात आला. तो घेऊन हे विद्यार्थी बाहेर आले व हा पेपर त्यांनी इंटरनेटवर टाकला हे या आयोजकांनी मान्य केले आहे. यंदा इतरही अनेक भानगडी घडल्या आहेत. नीटच्या परिक्षेत एकूण १८० प्रश्न असतात व त्यांना प्रत्येकी चार याप्रमाणे ७२० गुण असतात. ७२० पैकी ७२० गुण मिळवणारे दरवर्षी एक किंवा दोन विद्यार्थी असतात. यंदा मात्र तब्बल ६७ विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळाले आहेत. सर्वोच्च गुण मिळवणाऱ्यांची संख्या ६७ पटीने वाढणे हा संशयास्पद प्रकार आहे. यातही त्यातले सात-आठ जण एका विशिष्ट कोचिंग क्लासचे विद्यार्थी आहेत अशी जाहिरात करण्यात येते आहे. या परिक्षेत एका चुकीच्या उत्तराचे चार गुण कापले जातात. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे गुण हे ७१६ हेच असू शकतात. प्रत्यक्षात काही मुलांना ७१८, ७१९ असे गुण मिळाले आहेत. त्यातल्या काहींना पेपर उशिरा हाती मिळाल्याबद्दल ग्रेस मार्क देण्यात आल्याचा हास्यास्पद व न पटणारा खुलासा परीक्षा आयोजक मंडळाने केला आहे. कहर म्हणजे या परिक्षेत एक प्रश्न चुकीचा विचारला गेला होता. विद्यार्थ्यांनी त्याची उत्तरे दोन प्रकारे दिली. ती दोन्ही ग्राह्य मानून दोघांनाही गुण देण्यात आले. लाखो विद्यार्थ्यांचे आयुष्य टांगणीला लागले आहे अशा परीक्षा इतक्या ढिसाळपणे घेणाऱ्यांना कडक शासन करायला हवे. गुणी विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी चालू असलेला हा खेळ ताबडतोब थांबवा.

## विचार

# पुन्हा एकदा संपत्ती आणि वारसा कर

***वाढत्या आर्थिक विषमतेवर उपाय म्हणून भारत सरकारने दहा कोटी रुपयांपेक्षा अधिक संपत्ती असणाऱ्या अतिश्रीमंतांवर दोन टक्के कर लावावा, अशी शिफारस नामवंत फ्रेंच अर्थतज्ज्ञ थॉमस पिकेटी यांनी आपल्या शोधनिबंधातून केली आहे. सॅम पित्रोदा यांनी नुकताच वारसा कराचा पुरस्कार केला तेव्हा देशात वाद निर्माण झाला होता. असा एखादा कर लादला गेल्यास देशाच्या अर्थकारणात कोणत्या प्रकारचे बदल घडू शकतील?***



**हेमंत देसाई**

जगात आणि भारतात आर्थिक विषमता होती आणि आहे, हे कोणीही नाकारू शकत नाही. ही विषमता नष्ट व्हावी, यासाठी साम्यवाद-समाजवाद तसेच भांडवलशाही हे दोन उपाय सांगण्यात आले. साम्यवादी व्यवस्था जगभर अपयशी ठरली, परंतु भांडवलशाहीमध्ये सर्वजण सुखी होत नाहीत आणि समाजातील दोन वर्गांमध्ये प्रचंड विषमता निर्माण होते, याचा अनुभव आला. भांडवलशाहीमध्येही क्रोनी कॅपिटलिझम किंवा साट्या-लोट्याची भांडवलशाही जनतेने अनुभवली आहे. आपल्या व्यवस्थेत विशिष्ट उद्योगपतींचेच हित पाहिले जाते, अशी टीका ब्राझील, रशिया आणि अगदी भारतातदेखील केली जाते. आता भारतातील वाढत्या आर्थिक विषमतेवर उपाय म्हणून सरकारने दहा कोटी रुपयांपेक्षा अधिक संपत्ती असणाऱ्या अतिश्रीमंतांवर दोन टक्के कर लावावा, अशी शिफारस नामवंत फ्रेंच अर्थतज्ज्ञ थॉमस पिकेटी यांनी आपल्या शोधनिबंधातून केली आहे. राजीव गांधी यांचे विश्वासू सहकारी सॅम पित्रोदा यांनी नुकताच वारसा कराचा पुरस्कार केला आणि त्यावरून देशात वाद निर्माण झाला होता. परंतु पिकेटी यांनीही भारतात ३३ टक्के दराने वारसा कर आकारावा, अशी सूचना केली आहे.

देशात २०१४-१५ ते २०२२-२३ या काळात आर्थिक विषमतेत लक्षणीय वाढ झाली आहे, असा निष्कर्ष वर्ल्ड इक्वॅलिटी लॅबशी संलग्न असलेल्या अर्थतज्ज्ञांनी २० मार्च २०२४ रोजी काढला होता. त्यानुसार, देशात २००० च्या सुरुवातीपासून असमानता मोठ्या प्रमाणात वाढली. त्यावेळी देशातील एक टक्का श्रीमंतांचा २२ टक्के संपत्तीवर अधिकार होता. परंतु २०२२-२३ मध्ये हे प्रमाण ४० टक्क्यांवर जाऊन पोहोचले. म्हणजे जवळपास दुप्पट झाले. देशाच्या सर्वाधिक संपत्तीवर एका टक्क्याची मालकी असण्याच्या प्रकारात दक्षिण आफ्रिका, ब्राझील आणि अमेरिकेलाही भारताने मागे टाकले आहे. म्हणूनच पिकेटींनी भारतात दहा कोटी रुपयांपेक्षा अधिक असलेली निव्वळ संपत्ती ही वार्षिक दोन टक्के कर आकारणीस पात्र ठरावी. याचबरोबर दहा कोटी रुपयांपेक्षा जास्त संपत्तीवर ३३ टक्के दराने वारसा कराची आकारणी केली जावी, असे सुचवले आहे. त्यामुळे करमहसूल वाढून सकल देशांतर्गत उत्पादनात म्हणजेच जीडीपीमध्ये २.७३ टक्के योगदान दिले जाईल, असे सांगत या तरतुदी नव्याने लागू केल्या, तरी ९९ टक्के प्रौढ लोकसंख्येला कोणतीही झळ बसणार नाही, असे आपल्या शोधनिबंधात म्हटले आहे.

या प्रकारे करमहसूल वाढल्यास सरकारला शिक्षणावरचा खर्च दुपटीने वाढवणे शक्य होईल. केंद्राच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार, शिक्षणावर जीडीपीच्या तुलनेत सहा टक्के खर्च करणे आवश्यक आहे, प्रत्यक्षात तो तीन टक्केदेखील नाही. सॅम पित्रोदा यांनी वारसा कराचा मुद्दा मांडल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. काँग्रेसला हिंदूंची संपत्ती काढून घेऊन मुस्लिमांना वाटायची आहे, असा आरोप केला. त्यावरून बरेच रणकंदन झाले. देशातल्या श्रीमंत-गरीबांमधल्या संपत्तीतल्या तफावतीचा, विषमतेचा मुद्दा काँग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यात आहे. धोरणांमध्ये योग्य बदल करत देशातली संपत्ती आणि उत्पन्नातली वाढती विषमता कमी करू, असे काँग्रेसच्या जाहीरनाम्यात म्हटले होते. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनीही प्रचारसभा आणि भाषणांमध्ये वेळोवेळी याचा पुनरुच्चार केला. पित्रोदा यांच्या मुलाखतीनंतर वारसा कराचा मुद्दा चर्चेत आला. वारसा कर हा एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या वा तिच्या संपत्तीवर आणि पर्यायाने वारसदारांवर आकारला जातो. पित्रोदा यांनी आपल्या मुलाखतीत अमेरिकेतल्या या कराचा दाखला दिला; पण अमेरिकेत सरसकट सगळीकडे हा कर लागू करण्यात आलेला नाही. अमेरिकेतल्या सहा राज्यांमध्ये हा कर आकारण्यात येतो आणि प्रत्येक राज्यात आकारला जाणारा कर वेगवेगळा आहे.

अमेरिकेमध्ये इस्टेट टॅक्स आणि आणि वारसा कर असे दोन वेगवेगळे कर अस्तित्त्वात आहेत. यापैकी इस्टेट टॅक्स हा संपत्तीवर (ती वाटली जाण्यापूर्वी) आकारला जातो तर वारसा कर हा वारसदारांवर लावला जातो. अमेरिकेच्या आयोवा, केंटकी, मेरिलँड, नेब्रास्का, न्यू जर्सी आणि पेनसिल्व्हेनिया या राज्यांमध्ये वारसा कर आकारला जातो. संपत्ती देणाऱ्याशी असलेले वारसदाराचे नाते आणि संपत्तीचे मूल्य यावर या करआकारणीचे गुणोत्तर ठरते. ब्रिटनमध्येही वारसा कर अस्तित्त्वात आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर असलेल्या संपत्तीच्या मूल्यातून कर्जाची रक्कम वजा केली जाते आणि कायद्यानुसार जाहीर करण्यात आलेल्या करमुक्त संपत्ती मर्यादेपेक्षा (सव्वा तीन लाख पौंड) अधिकच्या संपत्तीवर हा ४० टक्के वारसा कर आकारला जातो. जपान, दक्षिण कोरिया, फ्रान्स या देशांमध्येही असा वारसा कर आकारला जातो.

भारतात एके काळी अशा प्रकारचा वारसा कर अस्तित्त्वात होता. त्याला ‘इस्टेट ड्युटी’ म्हटले जाई. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर संपत्तीचे हस्तांतरण होताना हा कर आकारला जाई. १९८५ मध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी ही इस्टेट ड्यूटी रद्द केली. संपत्ती कर आणि इस्टेट ड्युटी हे दोन्ही कर एकाच संपत्तीवर आकारले जातात. हा कर गोळा करण्यासाठी मोठा प्रशासकीय खर्च लागतो. संपत्तीचे विषम वितरण टाळण्यासाठी आणि राज्यांना आपल्या विकासयोजनांसाठी निधी देण्यासाठी हा कर आकारणे सुरू करण्यात आले होते; पण हे हेतू साध्य होत नसल्याचे तत्कालीन अर्थमंत्री व्ही. पी. सिंह यांनी म्हटले होते.

मुळात सरकार, मग ते कोणत्याही पक्षाचे असो; विविध करदात्यांना, खास करून कंपन्यांना देत असलेल्या करसवलती, करपरतावा आणि करप्रोत्साहनांना ‘रेव्हेन्यू फरगॉन’ किंवा सोडून दिलेले उत्पन्न असे म्हटले जाते. सरकारने २०१३-१४ मध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष कर मिळून सोडून दिलेले उत्पन्न साडेपाच लाख कोटी रुपये होते. २०१४-१५ मध्ये हा आकडा साडेचार लाख कोटी रुपयांवर तर २०१५-१६ मध्ये सहा लाख कोटी रुपयांवर गेला, अशी माहिती वित्त राज्यमंत्र्यांनी राज्यसभेत दिली होती. त्यानंतरच्या वर्षांमध्ये या रकमेबद्दलचा तपशील नियमितपणे उघड केला गेला नाही. जीएसटी हा अप्रत्यक्ष कर असल्यामुळे सर्वांना भरावा लागतो. २०२१-२२ मध्ये सरकारला जीएसटी करातून १४ लाख ८३ हजार कोटी रुपये मिळाले. या करापैकी ६४ टक्के हिस्सा हा तळातील म्हणजेच गरिबांमधील ५० टक्के जनता भरत होती. मधल्या ४० टक्के मध्यमवर्गियांकडून ३३ टक्के वाटा येतो आणि वरचे दहा टक्के, म्हणजे धनिक लोक फक्त तीन टक्के कर भरतात. व्यापारी आणि उद्योगपती हे कर जनतेकडून गोळा करतात, पण सरकारकडे भरत नाहीत, असेही घडते. २०२३ या वर्षातच या प्रकारे २२ हजार कोटी रुपयांचे कर बुडवले गेले, असा अंदाज केंद्रीय अप्रत्यक्ष कर मंडळाच्या अध्यक्षांनी व्यक्त केला होता. याखेरीज भारतातील मोठ्या प्रमाणातील निधी हा टॅक्स हेवन्स (म्हणजे जेथे कर नाही) देशांमध्ये पाठवण्याचे प्रमाण प्रचंड वाढले आहे.

दरम्यान, आपल्या देशात गेल्या काही वर्षांमध्ये उद्योगपतींची १६ लाख कोटी रुपयांची कर्जे माफ करण्यात आली आहेत. अनेक उद्योगपतींनी हजारो कोटी रुपयांची कर्जे बुडवून देशातून पोबारा केला आहे. भारतातील एका बड्या उद्योगपतीच्या मुलाच्या विवाहपूर्व समारंभावरच १२५० कोटी रुपये खर्च करण्यात आले. भारतातील दहा टक्के श्रीमंतांकडे ७७ टक्के संपत्ती आहे. देशात २०१८ ते २०२२ दरम्यान दररोज ७० दशलक्षाधीश तयार होत होते, अशी माहिती ‘ऑक्सफॅम’ या संस्थेने दिली होती. मात्र याच काळात दर दिवशी सरासरी ४० ते ५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. बड्या आयटी कंपन्या कर्मचाऱ्यांच्या संख्येत कपात करत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे या सुरुवातीच्या काळातही नोकरकपात वाढणार आहे. भारतातील ४० टक्के युवक बेरोजगार आहेत आणि एकूण बेरोजगारांपैकी ६५ टक्के सुशिक्षित आहेत. श्रीमंतांवर अतिरिक्त कर लावल्यास सरकारला मोठा महसूल मिळेल आणि शिक्षण व कौशल्य विकासावर भर देता येईल. त्याचप्रमाणे तरुणांना व्यवसाय, उद्योग सुरू करण्यासाठी प्रचंड प्रमाणात निधी उपलब्ध होईल. म्हणूनच पिकेटी यांच्या सूचनेचा सरकारने अवश्य विचार केला पाहिजे.

## आजकाल

# नितीश आणि चंद्राबाबूंवर महाराष्ट्राचे भवितव्य अवलंबून



**तुषार गायकवाड**

लोकसभा २०२४ च्या निवडणूकीत देशभरात एकूण १९ केंद्रीय मंत्र्यांचा पराभव झालेला आहे. महाराष्ट्रातील भाजपच्या पराभवला शिंदे शिवसेना अनेक ठिकाणी जबाबदार आहे. अब्दुल सत्तार यांनी रावसाहेब दानवेंच्या पराभवानंतर शिंदे गटाने या निवडणूकीत नेमकं काय केले? याची सिध्दता दिलेली आहे.

महाशक्तीच्या स्क्रिप्ट नुसार ४ जून नंतर महाराष्ट्राच्या सत्तेत खांदेपालट करुन अजित पवार यांना मुख्यमंत्री करण्याचे ठरले होते. मात्र शिंदे शिवसेनेने ७ लोकसभा सदस्य निवडून आणत एनडीए मध्ये आपले स्थान पक्के केले आहे. लोकसभा निवडणूकीच्या पराभवाची जबाबदारी स्विकारत पत्रकार परिषद घेऊन ‘मला मोकळं करा’ हे नाट्य फडणवीसांनी त्याच धर्तीवर केले होते.

मात्र ज्या अमित शहांनी ट्विटर वरुन आदेश देत फडणवीसांना उपमुख्यमंत्री केले आहे. त्याच अमित शहांनी फडणवीसांच्या राजकीय नाट्यावरुन कानउघडणी केल्याने नेहमी स्ट्राईक रेटचा हिशोब मांडणारे फडणवीस आज ‘पॉलिटिकल अरीथमॅटीक’ ची नवीन टूम घेऊन आले.

हे एका बाजूला असताना दुसरीकडे शिंदे शिवसेनेचे नरेश म्हस्के उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नवनिर्वाचित २ खासदार शिंदेच्या संपर्कात म्हणत मेडीयासमोर आले. हि निव्वळ व्हाटअबाउट्री आहे. शिंदेसैनिकांनी भाजपच्या पाडलेल्या उमेदवारांची चर्चा मुख्य प्रवाहातून दुसरीकडे वळवण्यासाठी केलेली चवचाल खेळी. याउलट शिवसेनेतून एकनाथ शिंदे आमदार खासदार घेऊन पक्ष फोडत बाहेर पडले तसेच शिंदेच्या बाबतीतही होऊ शकतेय. तसा धोका शिंदेना आहे.

शेठशहांच्या सोबतच नितीशकुमार चंद्राबाबू यांच्यावर शिंदे शिवसेनेचे भवितव्य अवलंबून आहे. एनडीए मध्ये नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू यांनी एकूण ९ कॅबिनेट मंत्री पदे, लोकसभा अध्यक्ष पद व राज्यसभेचे उपसभापती पद (उपराष्ट्रपती) अशी मागणी केली आहे. याशिवाय प्रमुख मागणी आंध्र प्रदेश व बिहार या राज्यांना ‘विशेष राज्य दर्जा’ देण्याची आहे. लोकसभा अध्यक्ष पद एनडीए मधील घटकपक्षास मिळाले तरच एनडीए मधील कोणत्याही घटक पक्षाला फुटण्याची भिती राहणार नाही. मात्र लोकसभा अध्यक्षपद भाजपाकडे राहिल्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघास १०० वर्षे पूर्ण होण्याआधीच भाजपा एनडीए मधील घटकपक्ष फोडून २७५ चा आकडा गाठेल. यासाठीच इंडिया आघाडीने सत्तास्थापनेचा दावा केलेला नाही. मात्र एनडीए मधील घटकपक्षांच्या संपर्कात इंडिया आघाडीचे नेते आहेत. एनडीए घटकपक्षांच्या अव्वाच्या सव्वा मागण्या पूर्ण करणे मोदींच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळास सहजी शक्य होणार नाही. त्यामुळे उद्या स्थापन होणारे सरकार हे सतत अस्थिरतेच्या छायेखाली राहील. ही अस्थिरता घालवण्यासाठी एनडीए मधील घटकपक्ष भाजपमध्ये विलीन करणे हि काळाची गरज आहे. अशावेळी शिंदे शिवसेना आणि लोजपा हे दोन पक्ष सर्वात आधी गिळंकृत केले जातील. महाराष्ट्रात शिंदे विरुध्द भाजपा हा अंतर्गत कलह यापुढे दिवसेंदिवस अधिक तीव्र होवून चव्हाट्यावर येताना दिसेल. भाजपाचे उमेदवार पाडणे शिंदेच्या आमदारांना येत्या विधानसभा निवडणूकीत महागात पडेल. तर भाजपा नेतृत्वाचा खांदेपालट होईल.

## लोकसंसद

### वाघांचे वाढते मृत्यू चिंताजनक

१ जानेवारी २०१९ ते २० मे २०२४ या गेल्या साडेपाच वर्षांच्या कालावधीत राज्यात एकूण १६० वाघांचा मृत्यू झाल्याचे चिंताजनक वास्तव राज्याच्या वनविभागाच्या अहवालातून पुढे आले आहे. यापैकी ९१ म्हणजे ५६.९ टक्के वाघांचा मृत्यू नैसर्गिकरित्या झाला असला तरी ६९ वाघांचा (४३.१ टक्के) अनैसर्गिक कारणांनी मृत्यू झाला आहे. शिकाऱ्यांच्या विष प्रयोगांना १३ वाघांना, जाळ्यात व सापळ्यात अडकून ९ वाघांना व उच्च दाबाच्या विद्युत प्रवाहांच्या धक्क्यांना २० वाघांना बळी जावे लागले आहे. तर रस्ते अपघातात २१ वाघांना अकाली मरण आले. वाघांच्या अनैसर्गिकरित्या होत असलेल्या वाढत्या मृत्यूंनी व्याघ्रप्रेमींच्या चिंतेत भर पडली असून वाघांच्या संवर्धनाची जबाबदारी असलेल्या राज्याच्या वनविभागाने वाघांच्या संवर्धनाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. प्रोजेक्ट टायगरमुळे २०२३ पर्यंत भारतातील वाघांची संख्या एकूण ३ हजार ६८२ इतकी झाली असून जगातील वाघांच्या लोकसंख्येच्या जवळपास ७५ टक्के इतकी आहे. ही अभिमानाची बाब असली तरी दुसरीकडे मात्र राज्यातच नव्हे तर इतर राज्यातही वर्षागणिक वाघांच्या मृत्यूच्या संख्येतही कमालीची वाढ होत आहे.

**- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१० जून**

**१८६२:-** शिकारकथांचे लेखक विष्णू गोविंद चिपळूणकर यांचा जन्म. ‘कृष्णसार (काळवीट) अथवा हरणाची शिकार’, ‘मृगया कुतूहल (बडोदे नरेश सयाजीराव महाराज यांच्या वाघाच्या शिकारी विषयी)’, ‘बनवराहघात’, ‘हिंदुस्थानातील सर्प’ अशी पुस्तके त्यांनी लिहिली. शिवचरित्रावर दोन व संभाजीराजांवर एक नाटकही अशी तीन नाटकेही त्यांनी लिहिली होती. याशिवाय ‘मृगया कुतूहल’ या ग्रंथातून त्यांनी बडोदा नरेश श्रीमंत सयाजी महाराज ह्यांच्या वाघाच्या पहिल्या शिकारीविषयीची प्रत्यक्षावलोकनातून दिलेली माहिती आहे. मराठी भाषेची लेखन पध्दती हे आणखी एक पुस्तक त्यांच्या नावावर आढळते. वैद्यकीय पेशात राहून त्यांनी मराठी साहित्याची विपूल सेवा केली.

**१९०४ :** लेखक विचारवंत पुरुषोत्तम गणेश सहस्त्रबुद्धे उर्फ पु.ग.स. यांचा जय १० जून १९०४ रोजी झाला. मराठी व संस्कृतमधून पदवी संपादन केल्यावर 'स्वभावलेखन' हा विषय घेऊन त्यांनी पीएच.डी. ची पदवी संपादन केली काही काळ अध्यापनाचे कार्य केल्यावर श्री. म. माटे यांच्या सहवासामुळे ते इहवादाकडे वळले. माटे यांच्यामुळे 'विज्ञानप्रणित समाजरचना' यासारखा प्रबंध लिहिण्याची त्यांना प्रेरणा मिळाली. पु.ग.स. यांनी आपल्या लेखनाची सुरुवात



ललितलेखनाने केली. 'लपलेले खडक' हे त्यांच्या लघुकथांचे पुस्तक. सत्याचे वाली व वरसंशोधन ही दोन नाटकेही त्यांनी लिहिली. कालांतराने ते निबंध या साहित्य प्रकाराकडे वळले. पु.ग.स. यांनी विज्ञानाचे तत्त्वज्ञान सांगणारा 'विज्ञानप्रणित समाजरचना' तर राजकारणामागचे तत्त्वज्ञान सांगणारा 'भारतीय लोकसत्ता' हा ग्रंथ लिहिला. याशिवाय त्यांनी लोकसत्तेला दंडसत्तेचे आव्हान, राष्ट्रधर्म, हिंदू समाज, इहवादी शासन, केसरीची त्रिमूर्ती आदी प्रबंधात्मक ग्रंथ लिहिले. तर माझे चिंतन, राजविद्या, पराधीन सरस्वती वैयक्तिक व सामाजिक हा त्यांच्या स्फुट निबंधात्मक लेखांचा संग्रह आहे. याशिवाय स्वभावलेखन व साहित्यातील जीवनभाष्य हे त्यांचे प्रबंधात्मक ग्रंथ केवळ साहित्यविषयक चर्चा करणारे आहेत. इ.स.पूर्व २३५ ते इ.स. १९४७ या दीर्घ कालावधीचा महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास कथन करणारा 'महाराष्ट्र संस्कृती' हा एक त्यांचा आणखी एक महत्त्वपूर्ण ग्रंथ. 'लोकहितवादीची शतपत्रे' हा त्यांनी संपादित केलेला ग्रंथ. भारताचा उत्कर्ष हाच त्यांच्या लेखनाचा मूळ गाभा असल्याने राष्ट्रनिष्ठा, लोकशाही, विज्ञाननिष्ठा, बुद्धीप्रामाण्य, व्यक्तीस्वातंत्र्य या मूल्यांचा त्यांनी आपल्या लेखनात सातत्याने वापर केला. त्यांचे सामाजिक, राजकीय व साहित्यविषयक विचार वाचताना त्यांच्या अध्यायनाची खोली दांडगा व्यासंग, चिंतनशिलता दिसून येते. वैचारिक निबंधाची परंपरा चालवणाऱ्या या महान लेखकाचे ४ मार्च १९८५ रोजी निधन झाले. **१९१३:-** इतिहास विषयक ग्रंथकर्ते प्रा. डॉ. मुरलीधर बाळकृष्ण देवपुजारी यांचा जन्म. ‘अमेरिकेचा इतिहास’, ‘रशियाचा इतिहास’, ‘आधुनिक आशियाचा इतिहास’ इ. ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. **१९२६:-** लेखक प्रा. गोपाळ बाळकृष्ण जोशी यांचा जन्म. ‘व्यथा’ आणि ‘शापभ्रग्न’ ह्या कादंबऱ्या त्यांच्या प्रकाशित झाल्या आहेत. **१९४९:-** साहित्यिक कथा-कादंबरीकार लेखक बाबाराव गंगाराम मुसळे यांचा जन्म. ‘हाल्या हाल्या दुधू दे’, ‘पखाल’, ‘वारुळ’, ‘पाटीलकी’, ‘दंश’, ‘स्मशानभोग’, ‘आर्त’ ह्या कादंबऱ्या तसेच ‘मोहरलेला चंद्र’, ‘झिंगु लुखे लुखू’, ‘नगरभोजन’ हे कथासंग्रह आणि ‘इथे पेटली माणूस-गात्रे’ हा काव्यसंग्रह. अशी त्यांची साहित्यसंपदा आहे. **१९६९:-** ख्यातनाम इतिहास संशोधक पांडुरंग सखाराम पिसुर्लेकर यांचे निधन. पणजी पुराभि लेखागाराचे संचालक असणाऱ्या पिसुर्लेकरांना मोडीसह फ्रेंच, पोर्तुगीज, इंग्रजी, संस्कृत इ. भाषा अवगत. ‘पोर्तुगीज मराठे संबंध अर्थात पोर्तुगीजांच्या दप्तरांतील मराठ्यांचा इतिहास’ हा मराठ्यासंबंधीचा त्यांचा महत्त्वपूर्ण ग्रंथ. **१९८९:-** ‘स्त्रीजीवनाची नवी क्षितिज’, ‘स्त्रीजीवनविषयक प्रश्न’ अशी पुस्तक, अनेक कथासंग्रह तसेच ‘शुभमंगल सावधान’ कादंबरी लिहिणाऱ्या कमलाबाई विष्णू टिळक यांचे निधन. ‘झोपट्टीतील झिपऱ्या’ व ‘सारेच खोटे’ तसेच ‘युधिष्ठिर’ (व्यक्तिचित्रे) ही पुस्तके त्यांनी कुमारांसाठी लिहिली. **२०१४:-** सुप्रसिध्द ‘३२ हार्ट बीट’ नावाचे मराठी आत्मकथनकार, लेखक प्रकाश वेलणकर यांचे निधन. ‘अचानक व टर्निंग पॉइंट’ हे दोन कथासंग्रही त्यांचे प्रसिध्द झाले आहेत.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१० जून

१) श्री. मुकुंद रामचंद्र जोशी
वरसोली, अलिबाग, १०-६-१९४८
२) श्रीम. जान्हवी जीवन केळकर
अलिबाग, १०-६-१९५४
३) श्रीम. वंदना वसंत सिंगासने
चेंढरे, अलिबाग, १०-६-१९४८
४) श्री. कमलाकर वसंत मगर
वेश्वी, अलिबाग, १०-६-१९५६


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**


# ई-रिक्षांचा वापर घनकचरा व्यवस्थापनासाठी करावा

## स्थानिकांची मागणी; लाखो रुपयांची बचत

**। माथेरान । वार्ताहर ।**

सुप्रीम कोर्टाच्या निर्देशानुसार सध्या हातरीक्षा मालकांना एकूण वीस ई-रिक्षा प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्याची मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे अल्पावधीतच या वीस ई-रिक्षा शालेय विद्यार्थी, दिव्यांग, जेष्ठ नागरिक, रुग्णांना त्याचप्रमाणे पर्यटकांना सेवा देण्यासाठी सज्ज राहणार आहेत. याअगोदर प्रायोगिक तत्त्वावर ठेकेदारांमार्फत सुरू असणाऱ्या नगरपरिषदेच्या मालकीच्या सात ई-रिक्षा बंद कराव्या लागण्याची शक्यता आहे. या सात ई-रिक्षांची विक्री करण्याऐवजी त्या घनकचरा व्यवस्थापनाच्या कामी आणल्यास दरवर्षी होणाऱ्या लाखो रुपयांची उधळणीवर मात करता येऊ शकते. याच माध्यमातून नगरपरिषदेच्या तिजोरीवर आर्थिक भार येणार नसून लाखो रुपयांची बचत यानिमित्ताने होऊ शकते.



हीच आर्थिक गुंतवणूक गावातील अन्य विकास कामांसाठी उपयोगी पडू शकते.

त्याचप्रमाणे पॉईंट्स भागातील कचऱ्याचे संकलन जलदगतीने करण्यासाठी मदत होऊ शकते. यामुळे माथेरान हे सुंदर पर्यटनस्थळ स्वच्छतेत अग्रेसर राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सात ई-रिक्षांमध्ये कोणत्याही प्रकारची प्रवासी वाहतूक न करता घनकचरा व्यवस्थापनासाठी उपयोगात आणल्यास हे शहर खऱ्या अर्थाने अस्वच्छतेवर मात करू शकते. या गावाचे हीत जोपासण्यासाठी नगरपरिषदेच्या अधिकारी वर्गाने व जिल्हाधिकारी यांनी सनियंत्रण समितीला विश्वासात घेऊन पाऊले उचलल्यास नक्कीच हे शहर प्लास्टिक कचरामुक्त पर्यटनस्थळ बनेल, अशी मागणी पुढे येत आहे.

> मॉनिटरिंग समितीकडे हा विषय मांडण्यात येईल. त्यानंतर पुढील आदेश प्राप्त झाल्यास निर्णय घेण्यात येईल.
> -राहुल इंगळे, प्रशासक तथा मुख्याधिकारी, माथेरान

## पासिंगसाठी रिक्षावाल्यांचे हाल

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना आरटीओकडून आपापल्या वाहनांचे पासिंग करुन घ्यावे लागते. नवीन रिक्षांसाठी दर दोन वर्षांनी तर वाहन आठ वर्षे वापरल्यानंतर ते दरवर्षी करुन घ्यावे लागते. वाहनांचे पासिंग हे प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्यही आहे. परंतु, वाहनाचे पासिंगकरुन घेण्यासाठी सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांना आपापली वाहने घेऊन पेण तालुक्यातील जिते येथे जावे लागते. सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या तीन चाकी रिक्षावाल्यांना श्रीवर्धन येथून मुंबई-गोवा महामार्ग अजूनही नादुरुस्त असल्याने आपले वाहन घेऊन जिते येथे जाणे अत्यंत त्रासदायक ठरत आहे.

## आंबेवाडी नाक्यावरून दुचाकी चोरीला

**। कोलाड । वार्ताहर ।**

कोलाड येथील आंबेवाडी नाक्यावरील रहिवासी चंद्रकांत लोखंडेयांच्यामालकीचीलालकाळ्या रंगाची बजाज पल्सर (एमएच-०६-बीक्यु-४११५) मोटार सायकल मंगळवारी (दि.४) रात्री ९:३५ वाजताच्या सुमारास चोरीला गेली आहे. चंद्रकांत यांच्या घरासमोररून अज्ञात चोरट्याने मुंबईच्या दिशेने चोरून नेली निदर्शनास आले आहे. याविषयी कोलाड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून दुचाकी कोठे आढळून आल्यास चंद्रकांत लोखंडे ९४२११६८०३३ यांच्याशी संपर्क साधावा.



# आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड मेडिकल असोसिएशन मदरहूड हॉस्पिटल खारघर व प्राथमिक आरोग्य केंद्र पोयनाड यांच्या संयुक्त विद्यमाने स्तन व गर्भाशय मुखाचा कर्करोग यासंदर्भात रविवारी (दि.९) सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये गर्भाशयाच्या कर्करोगाचे लवकरात लवकर निदान करण्याकरिता आवश्यक असलेली 'पॅप स्मिअर' हि चाचणी तसेच मुली व स्त्रियांमध्ये होणाऱ्या स्तन व गर्भाशयाच्या कर्करोगाविषयी समुपदेशन करण्यात आले. तसेच, उपस्थित मुली व महिला यांची त्याअनुषंगाने आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी आरएमएचे कार्यवाह डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सादर केली. तर, अध्यक्ष डॉ. निशिगंध आठवले यांनी उपस्थित महिलांना आरोग्य मार्गदर्शन केले. या शिबिरात साधारण ७७ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. त्यापैकी १६ महिलांच्या पॅप स्मिअर टेस्ट्स झाल्या. मदरहूड हॉस्पिटल येथील स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. श्रुती माने व डॉ. श्रुती उगरण यांनी गर्भशय मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग यासंदर्भात आपले विचार मांडले.

पोयनाड प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. पद्मश्री अंधेळकर, डॉ. औदुंबर कोळी व डॉ. स्मितल पाटील यांनी समन्वयक म्हणुन हातभार लावला. तर, डॉ. सुनीता पाटील, डॉ. रेखा म्हात्रे, डॉ. ओंकार पाटील यांनी व आरोग्य केंद्रातील पर्यवेक्षकांनी रुग्ण नोंदणीसाठी मदत केली. कार्यक्रम यशस्वी करण्यात डॉ. मकरंद पाटील, डॉ. युगेश पाटील, डॉ. प्रशांत बैकर, डॉ. भक्ती पाटील यांनी विशेष मेहनत घेतली. पोयनाड प्राथमिक आरोग्य केंद्राचे समुदाय आरोग्य अधिकारी आरोग्य सेवक आरोग्यसेविका गटप्रवर्तक आणि आशा व इतर स्टाफ यांनी विशेष मदत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरएमएचे कार्यवाह डॉ. राजेंद्र चांदोरकर यांनी केले. उपस्थितांचे आभारप्रदर्शन खजिनदार डॉ. नवलकिशोर साबू यांनी केले.

# सुशोभीकरणाच्या कामामुळे वीज वाहिनींचे नुकसान

**। मुरुड-जंजिरा । वार्ताहर ।**

सध्या मुरुडमधील समुद्रकिनारा सुशिभिकरणाचे काम जोरदार सुरु आहे. काही भागात गटार लाईनचे काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खोदण्याचे काम सुरु आहे. समुद्रकिनारी भागातून जमिनीच्या आतून २२ केव्ही मोठी वीज वाहीनी गेली आहे. जर का या वाहीनीला धोका पोचल्यास समुद्रकिनारा व दरबार रॉड लाईन या भागातील वीज जाण्याची दाट शक्यता आहे. या वाहीनींना काही ठिकाणी खरचटले सुद्धा आहे. त्यामुळे हा धोका अधिक बळावला आहे.



यासाठी मुरुड नगरपरिषदेने समुद्र किनाऱ्यांवरील गटाराचे काम लवकरात लवकर करून घेणे आवश्यक आहे. खड्डा करून कित्येक दिवस तसाच ठेवल्याने या वहिनींना धोका अधिक पोहचण्याची शक्यता आहे. भूगर्भातील वीज वाहीनीला धोका पोहचल्यास या भागातील लोकांना अंधारात राहण्याची वेळ येऊ शकते. यासाठी मुरुड नगरपरिषदेने सर्वात प्रथम गटारांचे काम तातडीने मार्गी लावावे, अशी मागणी होत आहे. याबाबत मुरुड नगरपरिषदेचे बांधकाम अभियंता चिदानंद व्हटकर यांनी सांगितले कि, २२ केव्हीची वीज वाहीनी गटार लाईन पासून दूर घेण्यात येणार आहे. ही वीज वाहीनी महावितरण अधिकारी व नगरपरिषदेच्या माध्यमातून दूर हटवणार आहोत.

## सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

सहकार क्षेत्रात माणगाव तालुक्यासह रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या उतेखोल येथील माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या. या संस्थेतील २०२३-२४ शैक्षणिक वर्षातील दहावी-बारावी व पदवी-पदविका प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या सभासदांच्या पाल्यांचा गुणगौरव सोहळा लवकरच आयोजित करण्यात येणार आहे. तरी, संस्थेच्या सभासदांनी आपल्या पाल्याच्या गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत निजामपूर मार्गावरील संस्था कार्यालय चौधरी कॉम्प्लेक्स या ठिकाणी दि.३० जूनपर्यंत सादर करावी, असे आवाहन संस्थेचे चेअरमन आनंद यादव यांनी केले आहे.

# सहावा वर्धापन दिन साजरा

**। उरण । वार्ताहर ।**

उरण शहरातील आनंद नगर येथील श्री स्वामी समर्थ समाज मंदिर सेवा संघाच्यावतीने मंदीराचा ६ वा वर्धापन दिन नुकताच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी भूपाली आरती, स्वामी समर्थ महाराजांचा अभिषेक, श्रीसारामृत, नैवेद्य आरती तसेच, दुपारी महाप्रसाद झाल्यानंतर संध्याकाळ पर्यंत पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी नैवेद्य आरती, भजन व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमात श्री स्वामी समर्थ सेवा संघ कार्यकारी मंडळ व भक्तगण सहभागी झाले होते.



# महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

हिरवळएज्युकेशनट्रस्टकॉलेज ऑफ सायन्स (सीएसआईटी) महाडमध्ये जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने बुधवारी (दि.५) जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधत पर्यावरण जागरूकता आणि परिसर स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करणारा एक प्रेरणादायी आणि प्रभावशाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला.



सुदेश कदम यांनी आपल्या मनोगतात पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व आणि शाश्वत बदल घडवून आणण्यासाठी विद्यार्थ्यांची भूमिका अधोरेखित केली. तसेच, आज आपण करत असलेली प्रत्येक छोटी कृती उद्या अधिक हिरवीगार आणि आरोग्यदायी करण्यासाठी आपण समर्पण आणि दृढनिश्चयाने आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्याची शपथ घेऊया, असे आवाहन केले. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोरभाई धारिया यांनी या उत्सवाविषयी आपले विचार व्यक्त करताना पर्यावरणीय उपक्रमांसाठी ट्रस्टच्या वचनबद्धतेवर भर दिला. जागतिक पर्यावरण दिन हा निसर्गाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याची आठवण करून देणारा आहे, असे विचार मांडले. महाविद्यालयात आम्ही आमच्या विद्यार्थ्यांमध्ये आणि समुदायामध्ये पर्यावरणविषयक चेतना वाढवण्यासाठी समर्पित आहोत, असे आश्वासन समाजाला दिले.

# दरडग्रस्त भागाची पाहणी

**। नेरळ । वार्ताहर ।**

शिवसेना ठाकरे गटाचे नितीन सावंत यांनी प्रशासन अधिकाऱ्यांसोबत दरडग्रस्त भागाची पाहणी केली. गेल्या वर्षी कर्जत तालुक्याला लागून असणाऱ्या खालापूर तालुक्यात इर्शालवाडीत दरड कोसळून शेकडो नागरिकांचे जीव गेले होते. दरम्यान, प्रशासनाला एखाद्या दुर्घटनेनंतर जाग येत असल्याने येणारा मान्सून डोळ्यासमोर ठेवून सावंत यांनी दरडग्रस्त भागाची पाहणी केली आहे.

तालुक्यात येत असलेल्या पळसदरी ठाकूर वाडी येथे दरड कोसळण्याची भीती ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात होती. याबाबत सावंत यांना माहिती देण्यात आली होती. सावंत यांनी ग्रामस्थांच्या सुरक्षिततेचा मुद्दा प्रथम लक्षात घेता निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत या प्रशासन अधिकाऱ्यांना सोबत घेवून पळसदरी ठाकूर वाडी येथे भेट दिली. यावेळी सावंत यांच्या सोबत संदीप सुर्वे, अभिजित दरेकर, प्रतिक सुर्वे आणि कार्यकर्ते व ग्रामस्थ सोबत होते.





# वरसोली समुद्रकिनारी स्वच्छता अभियान

**। सोगाव । वार्ताहर ।**

८ जून हा दिवस जागतिक महासागर दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील समुद्रकिनारी दी लाईफ फाऊंडेशन आणि पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता मोहीम उपक्रम घेण्यात आला.

या उपक्रमांतर्गत पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून जनजागृती करत सर्व उपस्थितांसोबत पर्यावरण संरक्षण व संवर्धनाबाबत प्रतिज्ञा घेण्यात आली. तसेच, स्वच्छता मोहिमेसाठी समुद्रकिनारा आणि त्या सभोवतालचा परिसर स्वच्छ व प्लास्टिक मुक्त करण्यात आला. यावेळी संकलित कचरा वरसोली ग्रामपंचायतीच्या स्वच्छता विभागाच्या स्वाधीन करण्यात आला.

या समुद्र स्वच्छता कार्यक्रमात पीएनपी होली चाईल्ड सीबीएसई स्कूलच्या मुख्याध्यापिका वेलैयमाल अलियास वेनी, उप-मुख्याध्यापिका सादाफ सबस्कर, सर्व शिक्षक, विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी दी लाईफ फाऊंडेशनचे प्रकल्प व्यवस्थापक शिलानंद इंगळे व सोशल वर्कर प्रणय ओव्हाळ, राखी राणे, आणि स्वयंसेवकांनी मेहनत घेतली.



## शिवाजी महाराजांना अभिवादन

**। सोगाव । वार्ताहर ।**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५०वा शिवराज्याभिषेक दिनानिमित्ताने अलिबाग तालुक्यातील किहीम ग्रामपंचायत कार्यालयात शिवाजी महाराज यांच्या अर्धपुतळ्याचे सरपंच पिंट्या गायकवाड यांच्यासह उपसरपंच मिलिंद पडवळ, सदस्य, ग्रामसेवक तसेच कर्मचारी यांनी पूजन करून पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. यावेळी किहीम ग्रामपंचायतीने शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्ताने गुढी उभारली व कार्यालय रांगोळी काढून सजविण्यात आले होते.

# माती चोरांनी वासराला उडवले

**। उरण । वार्ताहर ।**

मातीची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्या भरधाव वेगातील डंपरने वासराला उडवण्याची घटना रानसई खैरकाठी रस्त्यावर घडली आहे. या अपघातात वासरू जखमी झाल्याची माहिती प्राणी मित्रांना कळताच त्यांनी जखमी वासरावर औषध उपचार केले आहेत.

महसूल व वन विभागाने उरण तालुक्यातील वनराई परिसरातून माती उत्खनन करण्याचा ठेका हा माती चोर माफियांना कोणत्याही प्रकारची जागेवर जाऊन पाहणी न करता दिला आहे. त्यामुळे हे माती चोर माफिये पैशाच्या जोरावर वनसंपदेचा ऱ्हास करताना दिसत आहेत. त्यात काही माती चोर माफियांनी आपला मोर्चा हा रानसई, चिर्ले, चिरनेर, विंधणे ग्रामपंचायत हद्दीत वळविला आहे. यावेळी मातीची अवैध वाहतूक करणाऱ्या एका डंपरने रविवारी (दि.९) आपली तहान भूक भागविण्यासाठी जाणाऱ्या एका वासराला उडविण्याची घटना घडली. या झालेल्या अपघात वासरू जखमी झाल्याने डँम्पर चालकांनी पळ काढला आहे.



## शनीदेव जन्मोत्सव सोहळा

**। उरण । वार्ताहर ।**

उरण शहरातील गणपती चौक येथील हनुमान मंदिरात असलेल्या श्री शनिदेव जन्मोत्सव सोहळा नुकताच साजरा करण्यात आला. या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पहाटे धनंजय भागवत यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. सकाळी महाआरती नंतर श्री गजाजन प्रासादिक भजन मंडळाचे भजन, दुपारी श्री शनिदेव जन्मोत्सव, सायंकाळी भजन, रात्री महाआरती असे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाच्या अध्यक्षा अ‍ॅड. रेखा पाटील, राजेंद्र पाटील, रघुनाथबुवा हातनोलकर, विठ्ठल मामताबादे, धनंजय भागवत, महेश अधिकारी व कार्यकारी मंडळ सदस्य आदी उपस्थित होते.

## मुरुड शहरातील नाले साफ कधी?

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड शहरात जवळपास ३५ किमी गटारे व ५ किमी मुख्य नाले आहेत. पालिकेकडून एप्रिल व मे महिन्यात गटारांची साफसफाई केली जाते. यंदा धिम्यागतीने साफ सफाईचे काम सुरू असल्याने जुन महिना निघाला तरी नाले सफाई सुरूच आहे. राज्यात पावासाचे आगमन झाले असून मुरुड तालुक्यात कधीही पावासाला सुरुवात होऊ शकते. हे माहित असताना ठेकेदारांकडून नाले सफाईला सुरुवात होताना दिसत नाही. मुरुड शहराची स्वच्छ व सुंदर अशी ओळख आहे. यामुळे स्थानिक नागरिकांकडून नाराजी दर्शवली जात आहे.

# बोटी शाकारल्या समुद्रकिनारी; कोट्यवधींची उलाढाल ठप्प

**। उरण । वर्ताहर ।**

**१ जून ते ३१ जुलैपर्यंत शासनाच्या खोल समुद्रातील पावसाळी ६१ दिवसाच्या मासेमारी बंदीच्या आदेशानंतर मासळीची आवक घटली आहे. यामुळे मासळीचे भाव चांगलेच कडाडले आहेत. जिल्ह्याभरातील मासळीचे लिलाव बंद होऊन कोट्यावधींची उलाढाल ठप्प झाली असून कोळी बांधवांनी आपल्या बोटी किनारी आणून शाकारणी केली आहे.**



करंजा, मोरा, रेवस, मुळेखंड, खोपटा व वशेणी गव्हाण आदि बंदरांवर बोटी नांगरून ठेवण्यात आल्या आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये पाच हजाराहून अधिक मासेमारी नौका आहेत. त्यामध्ये काही नौका यांत्रिकी तर काही बिगर यांत्रिकी आहेत. ३१ मे हा मासेमारी हंगामाचा शेवटचा दिवस होता. आता पुढील दोन महिन्यांसाठी या बोटी किनाऱ्यावर विसावल्या आहेत. त्यानंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यापासून पुन्हा एकदा मासेमारीच्या नव्या हंगामाला सुरुवात होणार आहे.

बदलते हवामान, सांडपाण्यामुळे समुद्रात होणारे प्रदूषण, जेली फिश अशा अनेक समस्यांमुळे मासेमारीवर परिणाम होतो. त्यामुळे मासळीच्या उत्पादनात घट होते. तरी देखील जिल्ह्यातील मच्छीमार सर्व संकटांवर मात करत मासेमारीचा व्यवसाय करत आहेत. जून महिन्यात पावसामुळे उधाणाबरोबरच वारा, वादळ मोठ्या प्रमाणात येते. मासेमारीसाठी गेलेल्या बोटी अडकून पडण्याचा धोका अधिक असतो. यामुळे खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. तसेच, पावसाळ्यात मासळी प्रजोत्पादन कालावधी असतो.

मासेमारी बंदीमुळे मच्छीमारांनी नौका किनारी लावण्यास सुरुवात केली आहे. रायगड जिल्ह्यासह करंजा व मोरा बदरांवर बोटी नांगरण्यात आल्या असून काही ठिकाणी नांगरण्याचे काम अजुनही सुरू आहे.

**निवडक**

## कोलाडमध्ये जोरदार पाऊस

**कोलाड :** कोलाड परिसरात जोरदार पाऊस बरसाल्याने उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना थोडाफार दिलासा मिळाला आहे. तर, शेतकरी वर्ग ही शेतीच्या कामाला लागले आहेत. हवामान खात्याच्या अंदाजानुसार ७ जुन नंतर संपूर्ण कोकणात जोरदार पावसाळा सुरुवात होईल, असे भाकीत वर्तविण्यात आले होते. तसेच, यावर्षी सरासरी पाऊस उत्तम प्रकारे होईल असे सांगितले होते. हा अंदाज खरा ठरत असून कोलाड-खांब परिसरात शनिवारी (दि.८) जोरदार पावसाला सुरुवात झाली असुन शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे.

## ट्रेलरच्या बॅटऱ्यांची चोरी

**पनवेल :** दोन उभ्या ट्रेलरच्या बॅटऱ्यांची चोरी झाल्याची घटना कळंबोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. कळंबोली येथील आरटीओ ऑफिसच्या पाठीमागील गल्ली क्र.१ येथील स्टील मार्केटमध्ये दोन ट्रेलर पार्क केले होते. त्या दोन ट्रेलरच्या ३६ हजार रुपये किंमतीच्या प्रत्येकी दोन-दोन अशा चार बॅटऱ्या अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्या. याबाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून संबंधीत चारेट्यांचा शोध पोलीस करत आहेत.

## भंगार दुकानात चोरी

**पनवेल :** कळंबोली येथील भंगार दुकानाबाहेर ठेवलेल्या दोन लोखंडी प्लेटची चोरी अज्ञात चोरट्याने केल्याची घटना घडली आहे. अकबर अली मन्सुरी याने त्याच्या दुकानासमोर विकत घेतलेल्या दोन लोखंडी प्लेट ठेवल्या होत्या. दुकानात कोणी नसताना पाहून त्याचा गैर फायदा घेत अज्ञात चोरट्याने या प्लेट चोरुन नेल्या आहेत. याबाबतची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यामध्ये करण्यात आली असून पोलीस अज्ञात चोरट्याचा शोध घेत आहेत.

## ऑनलाईन फसवणूक

**पनवेल :** पनवेल शहरातील पळस्पे फाटा येथील एका सेवानिवृत्त ६४ वर्षीय महिलेची ऑनलाईन पद्धतीने अपसंपदेचा धाक दाखवून फोनवरुन तब्बल साडेपाच कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. मागील महिन्यात ही घटना घडली असून दोन दिवसांत या महिलेला पोलिसांची कारवाई होईल अशी फोनवरुन भिती दाखवून फसवणूक करण्यात आली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## १० जूनपर्यंत पोलीस कोठडी

**पनवेल :** अभिनेता सलमान खानला जीवे ठार मारण्याचा कट रचणाऱ्या काही आरोपींना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. यातील दीपक हवासिंग गोगालिया उर्फ जॉनी वाल्मिकी याला पनवेल न्यायालयात हजर केले असता १० जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दीपक याला पोलिसांनी १ जून रोजी ताब्यात घेतले. त्याने या गटात बाहेरून येणाऱ्या आरोपींची राहण्याची व गुन्हा करण्यासाठी वापरणार असलेल्या वाहनांची व्यवस्था करणार असल्याबाबत सहभाग घेतला होता.

# जामरूंग पाझर तलावाने गाठला तळ

### पंपाने पाणी सांडव्यात सोडण्याचा निर्णय



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील सोलनपाडा येथे असलेल्या जामरूंग पाझर तलावातील पाणी तळाशी गेल्याने गेली दोन महिने या भागात पाणी टंचाई निर्माण झाली होती. त्यामुळे स्थानिक नळपाणी योजना बंद पडण्याच्या मार्गावर असताना ग्रामपंचायत प्रशासनाने पुढाकार घेऊन पिण्याचे पाणी सर्वांना मिळावे म्हणून पंप लावून पाझर तलावातील पाणी सांडव्यात सोडण्यात आले. दरम्यान, ग्रामपंचायतीकडून दोन गावांना टँकरने पाणी पुरवावे लागत असल्याने तलावात असलेले पाणी सोडण्याचा निर्णय ग्रामपंचायतीन घेतला.

सोलनपाडा येथे जामरुंग पाझर तलाव म्हणून नोंद असलेल्या तलावातून पाझरून जाणाऱ्या पाण्यावर हिरे वाडी, पिंपरकर वाडा, सोलान पाडा, कामत पाडा, डुक्कर पाडा, ठोंबरवाडी, जामरूंग तसेच रजपे ग्रामपंचायतीमधील नळपाणी योजना अवलंबून आहेत. जामरुंग पाझर तलावातील पाणी मार्च महिन्यात आटल्यानंतर विहिरीचे पाणी खाली गेल्याने पाझर तलावाच्या खाली पाणी जाणे बंद झाले. त्यामुळे तलावातील पाणी नदीमध्ये येणे बंद झाले आणि त्यांनतर या पाण्यावर अवलंबून असलेल्या नळपाणी योजना कोलमडून गेल्या. नळपाणी योजना यांच्या विहिरी कोरड्या पडल्याने मागील दोन महिने या भागात मोठी पाणी टंचाईची स्थिती निर्माण झाली होती. अनेक ग्रामपंचायतीकडून पिण्याच्या पाण्यासाठी टँकर देखील सुरू केले होते. त्यात ग्रामपंचायतीकडून हिरेवाडी आणि पिंपरकरवाडा या भागात पिण्याच्या पाण्याची दूर करण्यासाठी टँकर सुरू करावे लागले होते.

पाणी टंचाईचे दुर्भिक्ष आणखी वाढल्याने शेवटी ग्रामपंचायतीकडून पाझर तलावातील पाणी पंप लावून सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. सरपंच दत्तात्रय पिंपरकर यांनी सर्व ग्रामस्थांच्या उपस्थितीत पाझर तलावातील पाणी विहिरीपर्यंत पाइपलाइन टाकून पाणी कालव्यात सोडण्यात आले. या पाण्यामुळे तेथील चिल्लारनदीची उपनदीमध्ये पाणी साठू लागले असून त्या पाण्यावर अवलंबून असलेल्या नळपाणी योजनेच्या उद्भव विहिरीत पाणी साठा तयार झाला आहे. मात्र, या पाझर तलावातील पाणी सोडण्याचे नियोजन लघु पाटबंधारे विभागाने आगामी काळात करायला हवे आणि त्यातून पाझर तलावातील पाणी जून महिना सुरू होईपर्यंत विहिरीत राहण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी आता स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे.

## अंबाजी पाटील यांचे निधन

**। पेण । प्रतिनिधी ।**

अंबाजी नथुराम पाटील हे बोर्झे गावचे शिक्षकी पेशात असताना आदर्श शिक्षक कसा असावा याचे उत्तम उदाहरण होते. अंबाजी म्हणाले होते की, जर मला पुरस्कार दयायचा असेल तर माझं काम बघूनच द्यावे, फाईल बघून नाही. त्यामुळे त्यांनी शेवटपर्यंत शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार स्विकारला



नाही. त्यांनी नाट्य क्षेत्रात ही मोठे काम केले आहे. ४५ वर्ष काळभैरव क्रीडा व युवक मंडळाचे अध्यक्ष राहिलेले आहेत. तसेच, बोर्झे गावचे पहिले तंटामुक्तीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले. अंबाजी यांनी निवृत्तीनंतर समाजसेवेचे व्रत अंगीकारले होते. अंबाजी पाटील मृत्यूसमयी ८६ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात २ मुले, २ मुली व नातू असा परिवार आहे. त्यांच्यावर अंत्यसंस्कार बोर्झे च्या स्मशाभुमीत करण्यात आले.



# रायगड किल्ल्याची स्वच्छता मोहीम

**। कोलाड । वार्ताहर ।**


गोवा-कोलाड येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित डॉ. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालय संस्थेचे सचिव संदीप तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि.७) मुंबई विद्यापीठ अंतर्गत तसेच विद्यार्थी कल्याण मंडळातर्फे रायगड किल्ला स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन यशस्वीपणे स्वच्छता मोहीम राबवली.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रतीक्षा पडवळ, डॉ. सूर्यकांत अमलपुरे, जयवंती अडलीकर, प्राजक्ता शिंदे, निखिल हरणेकर यांचे सहकार्य विद्यार्थ्यांना लाभले. या स्वच्छता मोहिमे अंतर्गत रायगड किल्ल्यावरील होळीचा माळ ते रोपवे पर्यंतच्या रस्त्यावरील साफ-सफाई विद्यार्थ्यांनी केली. तसेच, होळीचा माळ ते राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधीपर्यंत स्वच्छता मोहीम राबविली. तसेच, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू भामरे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे डॉ. सुनील पाटील व शिंदे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले.

# तळोजातून बाळाचे अपहरण

**। पनवेल । वार्ताहर ।**

तळोजा एमआयडीसी भागातील झोपडीत राहणाऱ्या महिलेच्या ७ महिन्याच्या मुलाचे अज्ञात व्यक्तीने अपहरण करुन नेल्याची घटना उघडकीस आली आहे. तळोजा पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात व्यक्ती विरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.



रविना इस्राईल अन्सारी (२२) व तिचा पती तळोजा एमआयडीसीतील असाही ग्लास कंपनीच्या बाजुला झोपडीमध्ये राहत असून ते रस्त्यावर फुगे विकून आपला उदरनिर्वाह करतात. रविना हिने आपल्या बाळाला झोपडीमध्ये पाळण्यात झोपवले होते. त्यानंतर ती झोपडीच्या बाहेर जेवण करण्यासाठी बसली असता अज्ञात व्यक्तीने अंधारामध्ये रविनाच्या झोपडीमध्ये घुसून तिच्या बाळाला उचलुन नेले. काही वेळानंतर रविना आपल्या झोपडीमध्ये गेली असता, पाळण्यामध्ये तिला तिचे बाळ दिसून आले नाही. त्यामुळे तीने आजुबाजुला सगळीकडे बाळाची शोधा-शोध केली. मात्र, तिला तीचे बाळ मिळुन आले नाही.

या बाळाचे नाक सरळ व केस भुरकट काळे रंगाचे आहेत. चेहरा गोल असून त्याच्या दोन्ही हातामध्ये काळ्या रंगाचे फ्लॅस्टीकचे कडे तसेच उजव्या हतात धाग्यात गुंफलेली काळ्या मण्यांची माळ व गळ्यात फिक्कट पिवळ्या रंगाचा धागा बांधलेला आहे. या वर्णनाचे बाळ आढळुन आल्यास त्याची माहिती तत्काळ पोलिसांना द्यावी, असे आवाहन तळोजा पोलिसांकडुन करण्यात आले आहे.



# यशवंत पाटील सेवानिवृत्ती

**। भाकरवड । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील श्रीगाव गावातील भाकरवडचे रहिवासी यशवंत हशा पाटील हे अलिबाग जिल्हा न्यायालयात हवलदार या पदावर कार्यरत होते. ते ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले.

१९८६ साली रायगड जिल्हा न्यायालय अलिबाग येथे शिपाई पदावर सेवेत रुजू झाले होते. यशवंत पाटील यांनी आपल्या सेवेच्या कारकिर्दीत ३६ वर्ष अलिबाग जिल्हा न्यायालयात शिपाई ते हवालदार या पदावर सेवा केली. त्यांची कुठेही बदली न होता अलिबाग येथेच सेवानिवृत्त झाले. यशवंत पाटील यांच्या रायगड जिल्हा न्यायालय येथे सेवानिवृत्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होतो. या कार्यक्रमात सह परिवार सपत्नीक तसेच, जिल्हा व सत्र न्यायाधीश भिलारे साहेब व कोर्टातील स्टाफ, कर्मचारी वर्ग यांच्याहस्ते यशवंत पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

# प्लास्टिक कचराविषयक जागरुकता

**। कोर्लई । वार्ताहर ।**

जागतिक महासागर दिनानिमित्ताने भारतीय मत्स्य सर्वेक्षणच्या मुंबई बेसने रत्नागिरी येथील मत्स्यविज्ञान महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सागरी प्लास्टिक कचरा या विषयावर जागरूकता कार्यक्रम तसेच भाषण स्पर्धा घेण्यात आली. तसेच, मिरकरवाडा बंदरावर जागरूकता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



भारतीय मत्स्य सर्वेक्षण मुंबई बेसचे इन्चार्ज अशोक कदम यांनी प्रोजेक्ट आणि समुद्रातील प्लास्टिक कचरा याबद्दल माहिती देताना प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावेत व विद्यार्थ्यांनी त्यात विशेष भूमिका निभावावी, असे सांगितले. तसेच, भाट्ये मिऱ्या येथील समुद्रकिऱ्यावर अनिरुद्ध अडसूळ यांनी महासागराच्या पूजेचे तथा किनारा स्वच्छता कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मुंबई बेसच्या टीमने विद्यार्थ्यांसोबत समुद्रकिनारा स्वच्छ केला. यावेळी महासागरातील प्लास्टिक प्रदूषण रोखण्यासाठी जागरूकता रॅलीचे आयोजन मिरकरवडा बंदर ते मच्छी मार्केटपर्यंत विद्यार्थी आणि मच्छीमारांच्या सहकार्याने करण्यात आले होते.

या निमित्ताने आयोजित भाषण स्पर्धेमध्ये १० स्पर्धकांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला होता. यात प्रथम पारितोषिक गोविंद चौधरी, दुसरे बक्षीस चांदणी दत्त, तर तिसरे बक्षीस शिवकन्या सोनवणे यांनी पटकावले. यावेळी डॉ. डबीर पठाण, डॉ. अनिरुद्ध अडसूळ, डॉ. संदेश पाटील, डॉ.राहुल सदावर्ते हे प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

# लाखो रुपयांचा मुद्देमाल नष्ट



**। पनवेल । वार्ताहर ।**

खांदेश्वर पोलीस ठाण्याकडील मागील पाच वर्षांच्या कालावधीतील विविध दाखल पुण्यातील ५८ दारूचे बॉटल कॅन, गुटखा, सिगारेट असा जप्त करण्यात आलेला मुद्देमाल माननीय न्यायालयाच्या आदेशाने नेवाळी येथे नष्ट करण्यात आला.

खांदेश्वर पोलीस ठाण्याकडील विविध दारूबंदी गुन्ह्यांमधील ६५ ई-कलमान्वये दारूच्या बॉटल जप्त करण्यात आल्या होत्या. संबंधित विभागाच्या आदेशाने गुटख्याचे पाच गुन्हे व दारूचे चाळीस गुन्हे अशा एकंदरीत साडेपाच लाखाची दारू आणि साडेपंधरा लाखाचा गुटखा मोठ्या प्रमाणात असल्याने मुद्देमाल कक्षामध्ये ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत होती. तसेच, या गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यात दीर्घ कालावधीपासून पडून राहीला होता. ईएमसी या संकल्पनेच्या माध्यमातून हा मुद्देमाल नष्ट करण्यात आला.

## सर्जिकल कॅम्पवीरांचा सन्मान

**। पनवेल । वार्ताहर ।**

जम्मू काश्मीर आणि आफ्रिका खंडातील मोझांबिक या ठिकाणी मेडिकल सर्जिकल कॅम्प घेऊन रोटरीने महत्वाचे योगदान केले. या मेडीकेल कॅम्पमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या रोटेरियन डॉक्टरांचा सन्मान सोहळा पनवेल मधील सुरुची सभाग्रुहात पार पडला. रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे प्रेसिडेंट रतन खारोल आणि सेक्रेटरी अनिल खांडेकर यांच्या विंनतीला मान देऊन या कार्यक्रमासाठी रोटरी डिस्ट्रिक्टच्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू फडके या प्रमुख पाहुण्या तर नितीन धमाले आणि डॉ. गिरीश गुणे हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते.



● मुरूडचे घोडेवाले आपल्या घोड्यासाठी पावसाळ्यात चारा कमी पडू नये म्हणून सध्या चारा लांबून आणून साठा करत आहेत. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

# साडेसहा लाखांचे मेफेड्रोन जप्त

**। पनवेल । वार्ताहर ।**

तळोजा फेज-१ मधील पेठाली गांव येथे एमडी नामक अंमली पदार्थ विक्री करण्यासाठी आलेल्या तरुणाला अंमली पदार्थ विरोधी पथकाने सापळा लावून अटक केली. मोबिन मेहबुब खान (२८) असे या तरुणाचे नाव असून अंमली पदार्थ विरोधी पथकाने त्याच्याजवळ असलेले ६.५० लाख रुपये किंमतीचे ६५ ग्रॅम वजनाचे एमडी जप्त केले आहे.

तळोजा फेज-१ मधील पेठाली गांव येथे एक व्यक्ती अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीरज चौधरी आणि त्यांच्या पथकाने पेठाली गांव येथे सापळा लावला होता. रात्री पावणेदहा वाजण्याच्या सुमारास मोबिन मेहबुब खान संशयास्पदरित्या आल्यानंतर अंमली पदार्थ विरोधी पथकाने त्याची धरपकड केली. त्यानंतर पोलिसांनी त्याची झडती घेतली असता, त्याच्याजवळ प्लास्टीकच्या पिशवीमध्ये पांढऱ्या रंगाचा एमडी (मेफोड्रोन) असा अंमली पदार्थ आढळून आला. अंमली पदार्थ विरोधी पथकाने मोबिन खान जवळ सापडलेले अंमली पदार्थ जप्त केले. तसेच, त्याच्या विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात एनडीपीएस कलमाखाली गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६
- ५०००० रूपये किमतीचा CNC मशीन ऑपरेटिंगचा कोर्स मोफत, मोफत, मोफत. पात्रता : १२ वी किंवा १५ वी पास, वयोमर्यादा- ३० वर्षेपर्यंत. पगार- १०००० रूपये, ८ तास ड्युटी, संपर्क : ९०४९६५५५२३
- Vacancies for office staff in Alibag. For interview call 9422383099 Time to call 10 am to 5 pm
- इलेक्ट्रिकल (वायरिंग) कामासाठी गरजू मुलांची (हेल्पर) गरज आहे. चेंढरे गोंधळपाडा ९२७०६१४०७७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# भरधाव वाहने चालवणाऱ्यांच्या संख्येत वाढ

### महाड पत्रकार संघाकडून कठोर कारवाईची मागणी

**। महाड । प्रतिनिधी ।**

**महाड शहरामध्ये अति वेगाने दुचाकी आणि चारचाकी वाहने चालवणाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी मागणी महाड पत्रकार संघाकडून करण्यात आली आहे. शहरामध्ये भर बाजारपेठेतून भरधाव दुचाकी चालवणाऱ्यांची संख्या वाढली असून याबाबत वाहतूक पोलिसांनी कठोर कारवाई करावी, अशी मागणी देखील करण्यात आली आहे.**



महाड शहरातील वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस वाढत असतानाच बेशिस्तपणे वाहन पार्किंगच्या समस्येला देखील नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. अशातच भर बाजारपेठेतून धूम स्टाईलने दुचाकी आणि चारचाकी जालवणाऱ्यांची संख्या वाढली आहे. यामुळे अपघात होऊ शकतो. तसेच, काही दिवसांपूर्वीच शहरातील महाड बेकरीजवळ अशाच पद्धतीने अपघात झाला होता. या अपघातामध्ये सुदैवाने कोणीही जखमी झाले नसले तरी चालवणारा चालक मात्र अल्पवयीन असल्याचे समोर आले होते. अशाच पद्धतीने महाड शहर महामार्गावर अल्पवयीन आणि वाहन चालवण्याचा परवाना नसलेल्या मुलांकडून तसेच मुलींकडून खुलेआम वाहने चालवली जात आहेत. ही वाहने चालवताना वेगाचे नियंत्रण ठेवले जात नाही.

महाड शहरामध्ये अशा धूम स्टाईलने वाहन चालवणाऱ्या अल्पवयीन मुलांना पोलिसांनी आळा घालण्यासाठी त्यांच्या पालकांवर कारवाई केली जावी, अशा प्रकारची मागणी महाड पत्रकार संघाकडून करण्यात आली आहे.

### वाहतूक नियंत्रणासाठी दोनच पोलीस

**शहराचा विस्तार दिवसेंदिवस वाढत असताना शहरामध्ये वाहतूक नियंत्रणासाठी केवळ दोनच पोलीस कार्यरत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी एक पोलीस तर अन्य ठिकाणी एक पोलीस उभा असतो. या वाहतूक पोलिसांकडून केवळ शहरांमध्ये येणाऱ्या आणि दापोलीकडे जाणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांना टार्गेट केले जात आहे.**

### परिवहन विभागाच्या नियमांचे तीनतेरा

**महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाकडून वाहन चालवताना अनेक नियम आणि अटी घालण्यात येतात. मात्र, वाहन चालकांकडून या नियमांचे पालन केले जात नाही. अनेकांकडे वाहन चालवायचे परवानेच नसतात तर काळया काचांमधून फिरणारे देखील अनेक जण दिसून येतात. महाडमध्ये महिन्यातून एक वेळा परिवहन विभागाचा कॅम्प असतो. मात्र, या ठिकाणी एजंटच्या माध्यमातून हे सर्व परवाने देण्याचे काम केले जात असल्याने नियमांचे काटेकोर पालन केले जात नसल्याचे दिसून येत आहे.**

# जेएसएम महाविद्यालयास नॅकची 'अ' श्रेणी प्राप्त



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य नामांकित म्हणून प्रसिद्ध असलेल्या अलिबाग येथील जे. एस. एम. महाविद्यालयास नॅकची 'अ' श्रेणी प्राप्त झाली आहे. महाविद्यालयाने मिळवलेल्या या घवघवीत यशाबद्दल जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्यावर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे. ॲड. गौतम पाटील, उपाध्यक्षा डॉ. साक्षी पाटील, सेक्रेटरी गौरव पाटील यांनी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक यांनी या सर्व प्रक्रियेत दिलेल्या बहुमोल योगदानाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

२१ व २२ मे २०२४ रोजी अलिबाग येथील जे. एस. एम. महाविद्यालयास बेंगळुरू येथील नॅक पिअर टीमने भेट दिली. या टीममध्ये अध्यक्ष म्हणून प्रा. डॉ. विजयकुमार सी. जी., कुलगुरु, महर्षी पाणीनी संस्कृत आणि वैदिक विद्यापीठ, उज्जैन, मध्यप्रदेश, समन्वयक म्हणून प्रा. डॉ. रणबीरसिंग जगलान, प्राध्यापक, चौधरी चरणसिंग कृषी विद्यापीठ, हिसार, हरियाणा तर सदस्य म्हणून प्रा. डॉ. नारायणम्मा तिरूमला, प्राचार्य, पद्मावती वुमन्स डिग्री अँड पीजी कॉलेज, तिरुपती, आंध्रप्रदेश यांचा समावेश होता. शैक्षणिक संस्थांचे मूल्यमापन करून त्यांचा दर्जा ठरविण्याकरता दर पाच वर्षांनी देशभरातील महाविद्यालयांना राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद म्हणजेच नॅकतर्फे त्रिसदस्यीय समिती भेट देऊन महाविद्यालयातील शैक्षणिक, सहशैक्षणिक उपक्रम, महाविद्यालयातील विविध सुविधा, प्रशासकीय कार्यालय यांचे परीक्षण करून तसेच संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक यांच्याशी संवाद साधून महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा निश्चित करत असते.

जे. एस. एम. महाविद्यालयास भेट दिलेल्या समितीने महाविद्यालयातील वर्गखोल्या, प्रयोगशाळा, विविध शैक्षणिक विभाग, ग्रंथालय, मैदान, जिमखाना, वनस्पतीउद्यान, प्रशासकीय कार्यालय, रंगमंच, ॲम्पीथिएटर, स्मार्ट क्लासरूम, अकाऊंट म्युझियम, कॅन्टीन व इतर सुविधांची पाहणी केली. तसेच गेल्या पाच वर्षात महाविद्यालयाने शैक्षणिक व सहशैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा आढावा घेऊन विद्यार्थी, माजी विद्यार्थी, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. साठ वर्षांची परंपरा असलेल्या या महाविद्यालयाने शैक्षणिक, सहशैक्षणिक व भौतिक सुविधांच्या बाबतीत केलेली कामगिरी उल्लेखनीय असून येणाऱ्या काळात हे महाविद्यालय या सर्व क्षेत्रांमध्ये आपल्या कामगिरीचा आलेख आणखी उंचावत नेणार आहे, असा विश्वास समितीचे अध्यक्ष प्रा. डॉ. विजयकुमार सी. जी. यांनी व्यक्त केला. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे या समितीने विशेष कौतुक केले.

ही नॅक मूल्यांकन प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ. सोनाली पाटील, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, निवृत्त प्राध्यापक प्रा. सुरेंद्र दातार, आयक्युएसी समन्वयक डॉ. प्रीती फाटे, आयक्युएसी समिती सदस्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.

## अज्ञात महिलेचा आढळला मृतदेह

**पनवेल :** अज्ञात महिलेचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळल्याने तालुक्यातील दहिवली गाव परिसरात खळबळ उडाली आहे. तालुक्यातील दहिवली गावाच्या परिसरात असणाऱ्या टेक ग्लोबल लॉजिस्टीक कंपनीच्या मागील जागेत एका अंदाजे ३० ते ३५ वयोगटातील महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आल्याने त्या गावचे पोलीस पाटील महेश पाटील यांनी तातडीने याबाबतची माहिती पनवेल तालुका पोलिसांनी कळविली. या घटनेची माहिती मिळताच पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वपोनि अनिल पाटील यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी वर्गाने सदर ठिकाणी धाव घेवून तो मृतदेह ताब्यात घेतला आहे. सदर महिलेच्या अंगावर पिवळ्या रंगाचा वनपिस ड्रेस आहे. तसेच कानात झुमके, हातात पिवळ्या धातूच्या बांगड्या, पायात जोडवी आहे.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


# दिवसा उन्हाचे चटके, सायंकाळी पावसाचा तडाखा



**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

मागील आठवड्यापासुन सायंकाळी पावसाचे चिन्ह निर्माण होत असून पावसाचे आगमन होत असल्यामुळे अनेक ठिकाणी विज पुरावा खंडीत होत असून घराबाहेर पडणे मोठ्या कष्टाचे झाले आहे. त्यातच वादळी वारा,पाऊस जरी रिम-झिम पडत असले तरी सुद्धा तेवढाच धोकादायक होत चालला आहे.

शिवाय ७ जूनला येणारा पाऊस वेळेवर आगमन झाल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यामुळे मात्र आपण पेरणी करावी की नाही अशा संकटात शेतकरी वर्ग सापडला आहे.

सायंकाळी येणारा पाऊस आणी दुपारी मात्र उन्हाचे चटके सोसावे लागत असल्यामुळे पावसाचे आगमन झाल्यामुळे सर्वत्र ठिकाणी चैतन्याचे वातावरण निर्माण होत असून मातीचा सुगंध दरवळत आहे.मात्र पाऊस कुठे रिमझिम तर कुठे मोठ्या सरी पाहावयास मिळत आहेत.

सायंकाळी आकाशात ढग निर्माण होत असल्यामुळे आज खूप पाऊस पडेल मात्र ही आशा फोल ठरत आहे. पावसाच्या विश्वासावर बळीराजा शेतीच्या कामात मग्न झाले असले तरी सुद्धा पाऊस लपवाछपवी खेळत आहे. सायंकाळी आकाशामध्ये काळे ढग निर्माण होत असून सकाळ पासून सायंकाळ पर्यंत अक्षरशः घामाच्या धारा वाहू लागल्या आहेत. यामुळे वातावरण उष्णतेचे प्रमाण वाढले आहे. ७ जूनला पावसाने जरी हजेरी लावली असली तरी सुद्धा पाऊस हुलकावणी देत आहे.

पाऊस येईल या विश्वासावर बळीराजाने पेरण्या केल्या असून तप्त उन्हामुळे आणि पक्ष्यांच्या उपद्रवामुळे शेतात पेरलेले धान्य वाया जहत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्याच बरोबर दिवसभरात पावसाचे आगमन तुरळक होत असल्याने शेतकरी चिंतेत आहे.

# नागोठण्यात श्री शनी महाराज जयंती उत्साहात साजरी



**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्यातील श्री शनी सेवा समितीच्या वतीने नागोठण्याची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता मंदिराच्या प्रांगणातील श्री जोगेश्वरी माता रंगमंचावर आयोजित केलेली श्री शनी महाराज जयंती गुरुवारी (दि. ६) सायंकाळी मोठ्या उत्साहात संपन्न झाली.

श्री जोगेश्वरी माता रंगमंचावर शनी जयंती निमित्त संध्याकाळी ७:०० वाजता श्री शनि महाराजांची स्थापना करुन पूजा व इतर धार्मिक विधी करण्यात आल्या. नंतर सायंकाळी आठ वाजता श्री शनी महाराजांच्या भक्तांसाठी दर्शन सोहळा सुरु करण्यात आला. दर्शन सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या नागोठणे शहर व परिसरांतील शनी भक्तांनी व नागरिकांनी रात्री महाप्रसादाचा लाभ घेतला. त्यानंतर झालेल्या महाआरतीच्या कार्यक्रमाने या शानिजयंती सोहळ्याचा समारोप करण्यात आला.

शनी जयंती सोहळा यशस्वी होण्यासाठी नागोठण्यातील श्री शनी सेवा समितीचे सर्व पदाधिकारी, सर्व सदस्य आदींसह अनेकांनी सहकार्य केले.

## पाच वर्षाच्या मुलासह आई बेपत्ता

**पनवेल :** पाच वर्षाच्या मुलासह आई राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता कुठेतरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार तिच्या पतीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे. मनिषा सोनू पोवल (२७, रा.करंजाडे) असे या महिलेचे नाव असून रंग गोरा, अंगाने मध्यम, उंची ५ फुट २ इंच, डोक्याचे केस काळे लांब, नाक सरळ, डोळे काळे आहेत. तर सोबत तिचा ५ वर्षीय मुलगा नक्ष रंग सावळा आहे. त्यांना हिंदी भाषा अवगत आहे. या दोघांबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाणे दुरध्वनी २७४५२३३३ किंवा पोलीस हवालदार युवराज म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.

## मोबाईलची चोरी

**पनवेल :** राहत्या घरात घुसून अज्ञात चोरट्याने रोख रकमेसह चार मोबाईल चोरुन नेल्याची घटना खांदा वसाहतीमध्ये घडली आहे.खांदा वसाहतीमधील सेक्टर १३ येथील एक्स्प्रेस विहार या ठिकाणी राहणाऱ्या पुंडलिक म्हात्रे यांच्या घराचा दरवाजा उघडा असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने घरात शिरुन रोख रक्कमेसह चार मोबाईल चोरुन नेले आहेत. याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पाच्छापूर ते दर्यागाव रस्त्याचे काम अपूर्ण

## पावसाळ्यात करावा लागणार चिखलातून प्रवास



**। पाली । वार्ताहर ।**

पाऊस डोक्यावर असताना देखील पाच्छापूर ते दर्यागाव रस्त्याचे काम अपूर्णच असल्याने यंदा मात्र येथील नागरिकांना चिखलातून प्रवास करावा लागणार असल्याचे स्पष्ठ चित्र दिसत आहे.

पाच्छापूर ते दर्यागाव या साडेतीन किमी पर्यंतच्या मार्गासाठी महाराष्ट्र रस्ते ग्रामीण विकास मंडळातून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत २ कोटी एवढा निधी उपलब्ध झाला आहे. सदरचे काम सिद्धीविनायक कंपनीच्या नावे असून पोट ठेकेदार आर.डी कंस्ट्रक्शन यांनी हाती घेतले आहे.

गेली काही महिन्यांपासून रस्त्याचे काम सुरू आहे.परंतु, रस्त्याचे काम हे अतिशय धीम्या गतीने चालले असून पावसाळा सुरुवात झाली असून सुद्धा अद्यापदेखील हे काम अपूर्णच आहे.

पाच्छापूर ते दर्यावर या मार्गावर पंचशीलनगर पाच्छापूर व दर्यागाव ठाकूरवाडी अशी मोठी लोकसंख्या असलेल्या दोन वस्त्या आहेत. याठिकाणाहून शाळकरी विद्यार्थी, नोकरीसाठी व व्यावसायिक पाली व इतर ठिकाणी जात असतात. परंतु, सदरच्या रस्त्यावर ठेकेदाराकडून फक्त खडीकरण करुन त्यावर माती भराव करण्यात आला आहे. त्यामुळे या पाऊसकाळात रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण होणार असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.परिणामी अशा चिखलातून याठिकाणी येणारी एसटी महामंडळाची बस ही येणं बंद होईल. व विद्यार्थी, वृद्ध, आजारी व्यक्ती तसेच प्रवाशांना चिखलातून वाट काढीत प्रवास करावा लागेल. परंतु, या भयानक परिस्थितीच गांभीर्य प्रशासनाला व ठेकेदाराला अजिबात दिसत नाही. प्रशासन व संबंधित अधिकारी सदर ठेकेदाराला दिरंगाई झालेल्या कामाबाबत कोणताही जाब विचारण्यास का तयार नाही? ठेकेदाराच्या दिरंगाईमुळे येथील नागरिकांचे जीवनमान कोलमडणार असून देखील यावर कोणीही राजकीय मंडळी भाष्य करण्यास का तयार नाहीत? असा संतप्त सवाल येथील नागिकांकडून केला जात आहे.

> पंचशीलनगर पाच्छापूर व दर्यागाव येथील नागरिक रस्ता तयार होण्याच्या प्रतिक्षेत आहेत. मात्र रस्त्याची परिस्थिती बघून यंदा चिखलातून पायी प्रवास करावा लागणार असेच दिसते आहे. याठिकाणी पंचशील नगर बौद्धवाडी व दर्यागाव ठाकूरवाडी अशी दुर्बल घटकातील लोक राहत आहेत म्हणून याकडे प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे का? इतर ठिकाणी प्रशासन व राजकीय मंडळींकडून कामासाठी पाठपुरवठा केला जातो मग आम्ही यापासून वंचित का? कोणीही अधिकारी या गंभीर परिस्थितीकडे बघण्यास तयार नाही.
> –सिद्धांत गायकवाड, युवा सचिव, सुधागड आरपीआय.


## राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड

(भारत सरकारचा उपक्रम)
प्रशासकीय इमारत, चेंबूर, मुंबई 400 074,
सीआयएन नं.: L24110MH1978GOI020185
नवरत्न कंपनी

**जाहिरात क्र.01062024**

**ट्रॉम्बे/थळ युनिट/क्षेत्रीय कार्यालयांसाठी संपूर्ण भारतात भरती**

राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ लिमिटेड) ही खते आणि औद्योगिक रसायनांचे उत्पादन आणि विपणन व्यवसायातील एक अग्रणीय नफा कमवणारी कंपनी आहे. ज्याचा एकूण व्यवसाय सुमारे रु. 21451.54 कोटी आहे. कंपनीला ऑगस्ट 2023 मध्ये प्रतिष्ठित "नवरत्न" दर्जा प्रदान करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्तरावरील विपणन नेटवर्कसह त्याचे उत्पादन युनिट महाराष्ट्र (ट्रॉम्बे चेंबूर, मुंबई आणि थळ, जिल्हा-रायगड) मध्ये आहेत. कंपनी उत्कृष्ट करियर विकास संधी प्रदान करते. कंपनी खालील पदांची भरती करू इच्छित आहे:

| अनु. क्र. | पद कोड | शाखा व पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|
| 01 | MTCHEM/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (रसायन) | 51 |
| 02 | MTMECH/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (यांत्रिकी) | 30 |
| 03 | MTELE/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (विद्युत) | 27 |
| 04 | MTINST/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (उपकरण) | 18 |
| 05 | MTCIV/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (सिविल) | 4 |
| 06 | MTFIRE/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (अग्निशमन) | 2 |
| 07 | MTCCLAB/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (सीसी लॅब) | 1 |
| 08 | MTIE/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (औद्योगिक अभियांत्रिकी) | 3 |
| 09 | MTMKTG/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (विपणन) | 10 |
| 10 | MTHR/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (मानव संपदा) | 5 |
| 11 | MTADMIN/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (प्रशासन) | 4 |
| 12 | MTCC/062024 | प्रबंधन प्रशिक्षणार्थी (निगमित संचार) | 3 |

इच्छुक उमेदवार अधिक माहितीसाठी कंपनीच्या वेबसाइट www.rcfltd.com वरील **'रिक्रूटमेंट'** सेक्शन पहावे.

मुख्य महा व्यवस्थापक (मा.सं.) निग.

समृध्दिची एकत्र वाटचाल



## महाराष्ट्र शासन
## महसुल व वनविभाग

तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालय, तळा जि. रायगड. दुरध्वनी क्रमांक - ०२१४०-२६९३१७ फॅक्स-२६९०४२
Email ID -tahasiltala@gmail.com

क्र. प्रशासन कात-५/जन्म-मृत्यू/जाहिर नोटीस/१०८५/२०२४ दि. ०७/०६/२०२४

**जाहिर नोटीस मसुदा**

१. श्री. भागोजी रामा हिरवे
मु.खांबिवली ता. तळा जि. रायगड — अर्जदार
विरुध्द
१. निबंधक जन्म-मृत्यू व विवाह नोंदणी अधिकारी, ग्रामपंचायत शेणवली — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहिर नोटीस अन्वये कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार भागोजी रामा हिरवे यांचा जन्म दि.१२/११/१९७० रोजी मौजे खांबिवली ता. तळा, जि. रायगड येथे जन्म झाला असून त्यांचे जन्म नोंद सामनेवाल्यांचे कार्यलयीन अभिलेख सदरी नसल्यामुळे सामनेवाल्यानी तसा दाखला अर्जदार यांना दि.२७/१२/२०२३ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये त्यांचा जन्म दि.१९/०१/२०२४ रोजी झाला असल्याचे घोषीत करुन जन्म दाखला आदेश मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी तळा यांचे न्यायालयात जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे अथवा हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळविण्यात यावी.

सबब विहीत मुदतीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास अर्जदार यांचा जन्म नोंदबाबत सदर प्रकरणी पुढील योग्य तो आदेश पारीत केला जाईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.०७ जून, २०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

सही/-
(मंगेश पालांडे)
कार्यकारी दंडाधिकारी तळा



## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की मौजे रामराज, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. केसरीनाथ जनार्दन ठाकुर, मु.जासई, पो.जासई, ता.उरण व श्री. दिलीपकुमार ढाकुळ माळी रा. चिर्ले, पो.जासई, ता.उरण यांनी विद्यमान मालक श्री. महेश वासूदेव पाटील यांच्याकडुन रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे.

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे आर | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| रामराज | २३/१ | ०-०७-०० | ०-०० |

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिप : सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

सही/-
ठिकाण: पेण
दि.१०/०६/२०२४
**ॲड. सुरेश देशमुख**
एल.आय.सी, ऑफिस शेजारी, पेण रायगड
मो.नं :-८४४६६७२२००


# मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**। उरण । वार्ताहर ।**

ग्रामीण भागात व उरण शहरातील भागात मोकाट भटकणाऱ्या व नागरिकांवर जीवघेणा हल्ला करणाऱ्या कुत्र्यामुळे उरणमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

सकाळी शाळेत जाणारे मुले, मॉर्निंग वॉक करणारे नागरिक, रात्री उशिरा कामावरून घरी परतणारे कर्मचारी कामगारांवर ही मोकाट कुत्रे हल्ले करत असल्याने उरण तालुक्यातील ग्रामीण भागात व उरण शहरात प्रवास करणे आता धोक्याचे झाले आहे. उरण नगरपरिषद हद्दीमध्ये नगर परिषद प्रशासनाने पाहिजे तसे लक्ष न दिल्याने मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उरण नगर परिषद हद्दीतील वीर सावरकर मैदान येथे काही दिवसांपूर्वी मोकाट कुत्र्यांनी एका व्यक्तीला हातावर चावून जखमी केले होते. जखमी व्यक्तीला त्वरित हॉस्पिटलमध्ये नेले होते. नगर परिषदेने या समस्येकडे दुर्लक्ष केल्याने मोकाट कुत्र्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. उरण नगर परिषदेने निर्बिजीकरण व भटक्या कुत्र्याच्या बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजेंद्र इटकरे यांना संपर्क केला असता होऊ शकला नाही.

> उरण शहरातील भटक्या कुत्र्यांवर नगर परिषदेने योग्य ती कारवाई करावी जेणेकरून मोकाट कुत्रे नागरिकांना त्रास देणार नाहीत. एखाद्या व्यक्तीला कुत्रा चावला व त्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्याला जबाबदार कोण? कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात यावे. जेणेकरून कुत्र्यांची संख्या वाढणार नाही. उरण नगर परिषदेने या समस्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन योग्य ती कारवाई करावी. – डॉ. फरहान नेरेकर. नागरिक,उरण


## E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000031387** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-76/ 2023-2024.** RFx e-tender for work of providing and fixing of 200W LED Floodlights IP 65 on existing high mast towers for yard lighting at various Substation under EHV (O&M) Division Panvel....3rd **call.** **Tender amount Rs. 10,51,012/-, EMD amount Rs. 10,510/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **10.06.2024, 18:00 Hrs. to 17.06.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 17.06.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **18.06.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी **मौजे-मुद्रे खुर्द,** ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या फ्लॅट मिळकतीचे मालक **विजया हरिश्चंद्र कांबळे** यांचेकडून सदर फ्लॅट मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

मौजे-मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड येथील स.नं.१८/१,२ब,२क यावरील वृंदावन गार्डन कॉम्पलेक्सचे गुलमोहर बिल्डींग या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील, एच विंग मधील, दुसऱ्या मजल्यावरील, रहिवासी सदनिका क्रमांक २०१, जिचे क्षेत्र ५०.२८ चौ.मी. कारपेट + क्षेत्र ३.७१ चौ.मी. ओपन टेरेस अशी रहिवासी सदनिका मिळकत असून जिचा कर्जत नगरपरिषदेच्या दप्तरी मालमत्ता क्रमांक २००४२५३ अशी नोंद आहे.

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १०/०६/२०२४
पत्ता गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
मो.नं. ९१५८३१३७३३

# भारताच्या पुजाने रचला इतिहास!





## युएफसीमध्ये विजय मिळवणारी बनली पहिली भारतीय फायटर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय खेळाडू सध्या विविध खेळात चमकताना दिसत आहेत. नुकतेच भारताच्या पुजा तोमर हिने इतिहास रचला आहे. तिने अल्टिमेट फायटिंग चॅम्पियनशीपमध्ये विजय मिळवला आहे. त्यामुळे ती हा पराक्रम करणारी भारताची पहिली मिश्र मार्शल आर्ट फायटर बनली आहे. पुजाने शनिवारी युएफसी लुईसविलेमध्ये ब्राझीलच्या रेयान डॉस सेंटोसला स्ट्रॉवेट (५२ किलोग्रॅम) पदार्पणाच्या सामन्यात ३०-२७, २७-३०, २९-२८ अशा फरकाच्या स्प्लिट डिसिजननंतर विजय मिळवला. पुजा म्हणाली, हा विजय सर्व भारतीय चाहत्यांचा आणि सर्व भारतीय फायटर्सचा आहे. आधी सर्वजण विचार करायचे की भारतीय फायटर येथे उभे राहू शकत नाहीत. माझा फक्त हाच विचार होता की मला इथे जिंकायचे आहे. जगाला दाखवायचे होते की भारतीय फायटर लूझर नाहीत. उत्तर प्रदेशमधील बुधाना गावात जन्मलेल्या पुजाने पाच वेळा नॅशनल वुशू चॅम्पियनशीप जिंकली आहे. कराटे आणि तायकांदोही खेळली आहे. तिने तिच्या आईला या विजयाचे श्रेय दिले आहे. कारण ती माझ्यासाठी जगाशी लढली. ३० वर्षीय पुजाने गेल्यावर्षी युएफसीबरोबर करार केला होता. दरम्यान, यापूर्वी अंशुल जुबली आणि भरत कंडोर यांनी युएफसीच्या स्पर्धा खेळल्या आहेत. पण त्यांना पहिला सामना जिंकता आला नव्हता.

# कोल्हापूर टस्कर्स संघ विजयी

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या (एमसीए) वतीने आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) २०२४ स्पर्धेत सातव्या दिवशी पहिल्या लढतीत राहुल त्रिपाठी (नाबाद ६७ धावा) याने केलेल्या आक्रमक अर्धशतकी खेळीच्या जोरावर पुनीत बालन ग्रुप कोल्हापूर टस्कर्स संघाने छत्रपती संभाजी किंग्स संघाचा डकवर्थ लुईस पद्धतीने १० गडी राखून पराभव करत पहिला विजय मिळवला.






गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर सुरु झालेल्या या स्पर्धेत पीबीजी कोल्हापूर टस्कर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गुणतालिकेत तळाच्या स्थानी असलेल्या कोल्हापूर संघाने दुसऱ्या स्थानी असलेल्या छत्रपती संभाजी किंग्स संघाचा पराभव करून विजयाचे खाते उघडले. सौरभ नवले (३ धावा), दिग्विजय पाटील (९) हे सलामीचे फलदांज स्वस्तात बाद झाले. त्यानंतर ओमकार खाटपेने ३१ चेंडूत ३८ धावाची संयमी खेळी केली. त्याने ४ चौकार व २ षटकार खेचले. ओम भोसले व ओमकार खाटपे या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ३३ चेंडूत ३८ धावांची भागीदारी केली. ओम भोसले व ओमकार खाटपे हे बाद झाल्यावर सौरभ सिंगने २१ धावा काढून संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. छत्रपती संभाजी किंग्स संघ १७ व्या षटकात ६ गडी १२२ धावा असताना पाऊस सुरु झाला. पावसाच्या व्यत्ययामुळे विजयासाठी पीबीजी कोल्हापूर टस्कर्स संघाला ११ षटकात ९३ धावांचे सुधारीत लक्ष्य देण्यात आले. कोल्हापूर टस्कर्स संघाकडून निहाल तुसामत (२-१७), योगेश डोंगरे (१-३), श्रीकांत मुंढे (१-१४), यश खळदकर (१-२७) यांनी सुरेख गोलंदाजी केली. ९३ धावांचे आव्हान पीबीजी कोल्हापूर टस्कर्स संघाने ७.२ षटकात एकही गडी न गमावता पूर्ण केले. यात कर्णधार राहुल त्रिपाठीने २९ चेंडूत नाबाद ६७ धावांची खेळी करून छत्रपती संभाजी किंग्सच्या गोलंदाजांचा खरपूस समाचार घेतला. त्यात त्याने ११ चौकार व २ षटकार ठोकत मैदान दणाणून सोडले. त्याला अंकित बावणेने १५ चेंडूत ३ चौकार व १ षटकाराच्या मदतीने नाबाद २६ धावा काढून साथ दिली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ४४ चेंडूत ९४ धावाची भागीदारी करून संघाला विजय मिळवून दिला.

# कार्लसनला बुद्धिबळाचे जेतेपद

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय ग्रॅंडमास्टर आर प्रज्ञानंदने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम फेरीत अमेरिकेच्या हिकारू नाकामुराला पराभूत करून आपल्या मोहिमेचा सकारात्मक शेवट केला आणि तिसरे स्थान पटकावले, तर जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावर असलेल्या मॅग्नस कार्लसनने आपल्या लौकिकावर टिकून राहून विजेतेपद पटकावले.




कार्लसनने १७.५ गुणांसह आपली मोहीम संपवली. विजेता बनल्यावर त्याला अंदाजे ६५ हजार डॉलर्सची रक्कम बक्षीस म्हणून मिळाली. त्याने प्रत्येक फेरी जिंकली. यामध्ये शास्त्रीय वेळ नियंत्रण आणि आर्मगेडन या दोन्हींचा समावेश आहे. अंतिम फेरीत पराभूत होऊनही, नाकामुरा १५.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर राहिला तर प्रज्ञानंद १४.५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर राहिला.


या स्पर्धेत त्याने जगातील अव्वल तीन खेळाडूंना पराभूत करणे ही त्याच्यासाठी दिलासादायक बाब होती. त्याने शास्त्रीय वेळेच्या नियंत्रणामध्ये कार्लसन आणि फॅबियानो कारुआना यांचा पराभव केला आणि आता नाकामुराविरुद्धच्या त्याच्या विजयामुळे तो पहिल्या तीन खेळाडूंना पराभूत करणारा पहिला खेळाडू ठरला आहे.

अलिरेझा फिरोझा (१३.५ गुण) हिने चौथा क्रमांक पटकावला. सहाव्या आणि शेवटच्या स्थानावर असलेल्या चीनच्या गतविजेत्या डिंग लिरेनचा पराभव केला. कारुआना १० गुणांसह पाचव्या स्थानावर आहे. महिला गटात चीनच्या वेनजुन झू हिने देशबांधव टिंगजी लेईचा पराभव करत अव्वल स्थान पटकावले. शास्त्रीय वेळेच्या नियंत्रणाखाली तीन विजयांमधून त्यांनी एकूण १९ गुण मिळवले.अण्णा मुझीचुकने १६ गुणांसह दुसरे स्थान पटकावले. तिच्या पाठोपाठ लेई (१४.५ गुण), भारताची आर वैशाली (१२.५ गुण) आणि कोनेरू हम्पी (१० गुण) आणि पिया क्रॅमलिंग (आठ गुण) यांचा क्रमांक लागतो.

# पाकिस्तानच्या श्रीमंत खेळाडूंच्या यादीत बाबर आझम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पाकिस्तानच्या सर्वात श्रीमंत खेळाडूंच्या यादीत पाकिस्तान क्रिकेट संघाचा विद्यमान कर्णधार बाबर आझम याच्या नावाचा समावेश आहे. बाबर आझम हा पीसीबीचा ए ग्रेड खेळाडू आहे. तो अनेक २० लीगही खेळतो. याशिवाय तो अनेक ब्रँड्सचा ॲम्बेसेडर देखील आहे. बाबर आझम याच्याकडे लक्झरी कारचे कलेक्शनही आहे. २९ वर्षीय बाबर आझमची एकूण संपत्ती ४१ कोटी रुपये आहे. बाबर आझमच्या कमाईचा प्रमुख स्त्रोत धुवांदार फलंदाजी करत बॅटने चेंडू बाऊंड्रीच्या पलीकडे पाठवणे अर्थात क्रिकेट खेळणे हाच आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डासोबतच्या त्याच्या ए ग्रेड करारानुसार त्याला दरमहा ३० लाख रुपये मिळतात.



**ब्रँड ॲम्बेसेडर बनूनही बाबर आझम कमावतो पैसा**

**स्वच्छ प्रतिमा आणि उत्तम खेळामुळे अनेक मोठ्या कंपन्यांनी बाबर याला ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून निवडले आहे. त्यामध्ये हेड अँड शोल्जर्स, ग्रे निकोल्स, क्रेडिटबुक, एचबीएल, ऑप्पो, हुआवेई, गेटोरेड, पेप्सी आणि नून पाकिस्तान यांसारख्या मोठ्या ब्रँड्सचा समावेश आहे. प्रत्येक एंडोर्समेंटसाठी तो सुमारे ५० लाख रुपये आकारतो.**

कसोटी सामन्यासाठी त्याला १२.५ लाख रुपये, वनडेसाठी ६.४ लाख रुपये आणि टी-२०साठी ४.२ लाख रुपये मिळतात.

# सुपर-८ चे समीकरणही जवळपास सुटले

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

वेस्ट इंडिजने युगांडावर ऐतिहासिक विजय नोंदवला आहे. या विजयानंतर सुपर-८ चे समीकरणही जवळपास सुटले आहे. वेस्ट इंडिजने सुपर-८ साठी आपला मजबूत दावा मांडला असून त्याची पात्रता जवळपास निश्चित झाली आहे. आयसीसी टी-२० वर्ल्ड कप २०२४ चा १८ वा सामना वेस्ट इंडिजने युगांडा विरुद्ध खेळला. या सामन्यात वेस्ट इंडिजचा एकतर्फी विजय झाला होता. प्रथम फलंदाजी करताना कॅरेबियन संघाने स्कोअरबोर्डवर १७३ धावा केल्या. ज्याच्या प्रत्युत्तरात युगांडाचा संघ अवघ्या ३९ धावांवर ऑलआऊट झाला. वेस्ट इंडिज आणि युगांडा हे दोन्ही संघ क गटात आहेत. यंदाच्या वर्ल्ड कप २०२४ साठी आयसीसीने सर्व २० संघांना एकूण ४ गटांमध्ये ठेवले आहे. क गटातील दोन्ही संघ जवळपास निश्चित

**कोणते संघ सुपर आठसाठी पात्र ठरणार**

**भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्थान, वेस्ट इंडिज, दक्षिण अफ्रिका, बांगलादेश**

झाले आहेत. जे सुपर-८ साठी पात्र ठरतील. अफगाणिस्तान या गटात २ सामन्यांतून ४ गुण आणि +५.२२५ नेट रन नेटसह पहिल्या स्थानावर आहे. याशिवाय वेस्ट इंडिजही २ सामन्यांत ४ गुण आणि +३.५७४ च्या नेट रन नेटने दुसऱ्या स्थानावर आहे. या दोन्ही संघांचा नेट रन नेट अतिशय चांगला आहे. अशा परिस्थितीत दोन्ही संघ एक एक सामना जिंकून सुपर-८ साठी पात्र ठरतील. अ गटात अमेरिका २ सामन्यात २ विजय नोंदवून ४ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे. तर भारताने देखील आतापर्यंत खेळलेला एकमेव सामना जिंकला आहे आणि गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर आहे. अशा स्थितीत हे दोन्ही संघ अ गटातून सुपर-८ साठी पात्र ठरतील. या गटातून पाकिस्तान संघ बाहेर जाऊ शकतो. ऑस्ट्रेलियाने ब गटातून २ सामने खेळले असून दोन्ही सामने जिंकले आहेत. अशा परिस्थितीत तो सुपर ८ साठी सहज पात्र ठरू शकतो. यामध्ये इंग्लंडला धक्का बसू शकतो. ड गटातून दक्षिण आफ्रिकेनेही खेळलेले दोन्ही सामने जिंकले आहेत. बांगलादेशनेही आतापर्यंत खेळलेला एकमेव सामना जिंकला आहे. अशा परिस्थितीत हे दोन्ही संघ सुपर-८ साठी पात्र ठरू शकतात. म्हणजेच भारत, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान, वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका आणि बांगलादेश हे ७ संघ सुपर-८ साठी पात्र ठरू शकतात.

## कराविरुद्धच्या सामन्यासाठी भारतीय संघ जाहीर

**। कोलकता । वृत्तसंस्था ।**

फिफा विश्वकरंडक पात्रता एएफसी आशिया करंडकाच्या अंतिम सामन्यासाठी भारताचे प्रशिक्षक इगोल स्टिमॅक यांनी २३ खेळाडूंचा संघ जाहीर केला. सुनील छेत्रीच्या निवृत्तीनंतर भारतीय संघ प्रथमच महत्त्वाच्या सामन्यात खेळणार आहे. दोहामध्ये होणाऱ्या सामन्यासाठी भारतीय संघ रविवारी रवाना होणार आहे. ११ जून रोजी अल रायन येथील अहमद बिन अली स्टेडियममध्ये भारताचा बलाढ्य कतारविरुद्ध सामना होणार आहे.

काही दिवसांपूर्वी कोलकतामध्ये कुवेतविरुद्धचा भारताचा सामना गोलशून्य बरोबरीत सुटला होता. त्यामुळे गटामध्ये भारतीय संघ पाच गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

# शाहीन अफ्रिदीने बुमराहच्या मुलाला दिले होते गिफ्ट

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**

भारतासह जगभरात भारत आणि पाकिस्तानच्या सामन्याची चर्चा सुरु आहे. जगभरातील चाहत्यांना भारत आणि पाकिस्तानच्या सामन्याची उत्सुकता आहे. याच दरम्यान, भारतीय क्रिकेट संघाचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह याची पत्नी संजना गणेशन हिने एका मुलाखतीत केलेले विधान सोशल मीडियावर चर्चेत आहे. आशिया चषक स्पर्धेत पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज शाहीन अफ्रिदीने जसप्रीत बुमराहला मुलगा अंगदसाठी भेटवस्तू दिली होती.

आशिया चषकाच्या साखळी फेरीत जेव्हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना पावसामुळे धुवून निघाला तेव्हा शाहीनने बुमराहला एक भेटवस्तू दिली. बुमराह नुकताच बाबा झाल्यामुळे शाहीनने त्याला भेट म्हणून बॉक्समध्ये काहीतरी दिले होते. दरम्यान, आफ्रिदीने बुमराहला भेट दिल्यामुळे त्याच्यावर सर्वच स्तरातून कौतुकाचा वर्षाव झाला.



**बुमहारची पत्नी संजना नेमकं काय म्हणाली?**

**'द ग्रेड क्रिकेटर युट्यूब' चॅनेलवर बोलताना संजना म्हणाली की, शाहीनने दिलेल्या बॉक्समध्ये कोणते गिफ्ट नव्हते. त्यामध्ये एक संच होता. ज्यामध्ये अनेक गोष्टी होत्या, ज्यांचा वापर अंगद आजही करतोय. मैदानात संघर्ष होणे साहजिकच आहे, पण मैदानाबाहेर असे होता कामा नये, असे मला वाटते.**

## राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत

# कादंबरी राऊतची सुवर्ण कामगिरी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

येथील परळ विभागात आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत मुळची पुंदरची असलेल्या कांदबरी राऊन हिने चमकदार कामगिरी केली आहे. कादंबरीने राष्ट्रीय विक्रमाला गवसणी घातली आहे. कांदबरीने सबज्युनिअर गटातील 'स्कॉट' तब्बल १९७.५ किलो वजन उचलत नॅशनल रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. कांदबरीने या कामगिरीसह सुवर्ण पदक पटकावले आहे. महाराष्ट्र राज्य, सब ज्युनियर, ज्युनियर, मास्टर पुरूष आणि महिला पॉवर लिफ्टिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमानाने भोईवाडाय येथे या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.




कादंबरीची या कामगिरीसह राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडही करण्यात आली आहे. पंजाब येथे राष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेला पटियाला येथे १६ जूनपासून सुरुवात होणार आहे. कादंबरीची राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी निवड झाल्याने कुटुंबिय आणि प्रशिक्षकही आनंदी आहेत. तसेच कादंबरीचे सुवर्ण काम गिरीसाठी तिचे सोशल मीडियावर अभिनंदन केले जात आहे.

कांदबरीच्या या सुवर्ण यशामागे तिची अफाट मेहनत आहे. कादंबरीने अभ्याससह पॉवर लिफ्टिंगचा दररोज न चुकता सराव केला. अनेकदा अभ्यास आणि खेळ यात समतोल राखताना अनेकांची तारांबळ उडते.

मात्र, कादंबरीने अभ्यासाचा 'खेळ' होऊ न देता दोन्हीकडे योग्य लक्ष दिले. तिने आपल्या या यशाचे श्रेय तिचे आई-वडील, कुटुंबिय आणि प्रशिक्षकांना दिले आहे.

आता कादंबरीकडून पटियाला येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत जोरदार कामगिरीची आशा आहे. कांदबरी तीचे प्रशिक्षक पी बाकीराज यांच्या मार्गदर्शनात या स्पर्धेत तिचे नशिब आजमवणार आहे. तसेच कादंबरीला या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत. त्यामुळे आता या राष्ट्रीय स्पर्धेतही कादंबरीकडून अशाच प्रकारे सुवर्ण पदकाची आशा सर्वांनाच असणार आहे.

# चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पाकिस्तानात खेळवली जाणार

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

करोडो क्रिकेट चाहते सध्या आयसीसी टी-२० वर्ल्ड कप २०२४ च्या उत्साहात मग्न आहेत. वर्ल्ड कपमधील प्रत्येक सामन्यानंतर सुपर-८ चे समीकरण बदलत आहे. २ जूनपासून विश्वचषक स्पर्धेला सुरुवात झाली असून, त्याचा अंतिम सामना २९ जून रोजी होणार आहे. दरम्यान, आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ संदर्भात एक मोठी माहिती समोर आली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पाकिस्तानात खेळवली जाणार आहे.




चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे यजमानपद पाकिस्तानला मिळणार आहे की नाही यावरून अनेक वाद निर्माण झाले आहेत. ही स्पर्धा खेळण्यासाठी पाकिस्तानला जाणार नसल्याचे टीम इंडियाचे म्हणणे आहे. बीसीसीआयचे म्हणणे आहे की, आपल्या खेळाडूंच्या सुरक्षेचा विचार करून, भारताचे सामने इतर कोणत्याही देशात आयोजित करा. टीम इंडिया पाकिस्तानला जाणार नाही. मात्र, याबाबत पाकिस्तानने आयसीसीकडे तक्रारही केली असून, यासोबतच भारताचे सर्व सामने कोणत्या ठिकाणी होणार हेही जाहीर केले आहे. या एपिसोडमध्ये चॅम्पियन्स ट्रॉफी खेळण्याची तारीख समोर आली आहे. क्रिकबझच्या अहवालानुसार, चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ हि १९ फेब्रुवारी ते ९ मार्च दरम्यान आयोजित केली जाईल.

टी-२० विश्वचषक २०२४ चा रोमांचक टप्पा सुरू आहे. पहिल्या सामन्यात भारताने आयर्लंडचा पराभव केला होता. आता भारताचा वर्ल्ड कपमधील दुसरा सामना रविवारी म्हणजेच ९ जून रोजी पाकिस्तानविरुद्ध होत आहे.

हा सामना देखील केवळ नासाऊ काउंटी क्रिकेट स्टेडियमवर खेळवला जाईल. भारताने हा सामना जिंकला तर तो सुपर ८ म ध्ये प्रवेश करणार आहे हे निश्चित मानले जात आहे.

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)